डॉ. वि. भि. कोलते संशोधन केंद्र आणि वाचनालय

व

विदर्भ साहित्य संघ, शाखा यवतमाळ आयोजित

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

# ९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

यवतमाळ

११, १२, १३ जानेवारी २०१९

## अध्यक्षीय भाषण

११ जानेवारी, २०१९

संमेलनाध्यक्ष

**डॉ. अरुणा ढेरे**

(कृपया १२ जानेवारी, २०१९ पूर्वी हे भाषण प्रकाशित करू नये.)

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे
९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, यवतमाळ
अध्यक्षीय भाषण : डॉ. अरुणा ढेरे

●
११ जानेवारी, २०१९

●
प्रकाशक :
**डॉ. इंद्रजीत ओरके**
कार्यवाह,
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ
द्वारा : विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, तिसरा माळा,
झाशी राणी चौक, सीताबर्डी,
नागपूर ४४० ०१२
भ्रमणभाष : ९४२२१४७५८५

●
मुद्रक :
**नारायण ऑफसेट वर्क्स**, नागपूर

---

टीप : अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ लेखकाच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करते. मात्र सदर अध्यक्षीय भाषणातील प्रकाशित मजकूर, विधाने, मते, इत्यादीशी मुद्रक, प्रकाशक, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व त्याचे पदाधिकारी आणि संमेलनाचे आयोजक सहमत असतीलच असे नाही.

## ९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

यवतमाळ

# डॉ. अरुणा ढेरे

यांचे

# अध्यक्षीय भाषण

■

प्रिय रसिकहो,

या व्यासपीठावर मी कमालीच्या संकोचानं आणि सानंद कृतज्ञतेनं भारलेल्या अवस्थेत उभी आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाला साजेसं काम आपापल्या वाङ्मयक्षेत्रात करून या पीठावर उभं राहण्याचा योग्य अधिकार मिळवणारे अनेक पूर्वाध्यक्ष – अगदी संमेलनाच्या प्रारंभकाळापासूनचे मोठे पूर्वाध्यक्ष मन:चक्षूंना दिसताहेत आणि या, नव्हे कोणत्याच सार्वजनिक पदा–पीठांचा विचार मनात न आणता, अपार्थिव ज्ञानानंदामागे अपरिहार्यपणे असणारं सगळं भलंबुरं लौकिक जीवन साधेपणानं स्वीकारणं आणि काम करत राहणं हीच ज्यांची स्वाभाविक वृत्ती होती, ते माझे संस्कृतिसंशोधक वडील तर माझ्यासाठी माझ्यामागेच उभे आहेत.

वाङ्मयपरंपरेतल्या त्या थोरल्या वाडवडलांचं आपल्यावर असलेलं

ऋण फेडण्याची जबाबदारी तुम्ही माझ्यावर दिली आहे. श्री. ना. पेंडसे, नरहर कुरुंदकर, दि. के. बेडेकर, चिं. वि. जोशी, बा. भ. बोरकर, त्र्यं. वि. सरदेशमुख, इरावतीबाई कर्वे, सरोजिनी वैद्य, अरुण कोलटकर, दि. पु. चित्रे, नामदेव ढसाळांसह कितीतरी, जे अनेक कारणांनी या व्यासपीठापासून दूर राहिले, या साहित्यकार-विचारवंतांना त्या पदाची इच्छा होती की नाही, हा प्रश्न वेगळा; पण त्यांच्याकडे ते पद सन्मानपूर्वक जावं अशी परिस्थिती आपण निर्माण करू शकलो नाही हेही तितकंच खरं. त्यांच्याविषयीची आपल्या मनातली आदरभावना आणि त्यांचा या प्रकारे गौरव करता न आल्याची खंत प्रकट करण्याचा अनुक्त आग्रह तुम्ही मला केला आहे आणि इंदिराबाईंची क्षमा मागण्याची संधी दिली आहे.

म्हणून एक प्रकारे, धार्मिक परिभाषेतली संकल्पना पूर्ण निधर्मी अर्थानं वापरून मी असं म्हणते आहे की वाङ्मयक्षेत्रातल्या ऋणमोचन तीर्थावर मी आज उभी आहे आणि तुमच्या वतीनं माझी शाब्दिक कृती हा पूर्वऋणांतून मुक्त होण्याचा विधी आहे.

आपण सर्वच जणं हे जाणतो आहोत की, या वेळची संमेलनाध्यक्षाची निवड ही एक ऐतिहासिक घटना आहे. या घटनादुरुस्तीचं स्वागत आपण इतक्या मन:पूर्वक केलं आहे, की महाराष्ट्रातल्या, बृहन्महाराष्ट्रातल्या आणि परदेशातल्याही मराठी वाचकांना आणि रसिकांना झालेला आनंद अभूतपूर्वच असल्याचं मी गेल्या दोन-अडीच महिन्यांच्या काळात भरभरून अनुभवलं आहे. मी या आनंदाचं केवळ निमित्त आहे, पण वाचणाऱ्या समाजाच्या सगळ्या थरांमधून आणि सगळ्या माध्यमांमधून सहजस्फूर्तपणे व्यक्त झालेल्या या आनंदाचं श्रेय घटनादुरुस्तीसाठी झटणाऱ्या, त्यासाठी आग्रह धरणाऱ्या आणि ती प्रत्यक्षात आणणाऱ्या जुन्या-नव्या सर्वांचं आहे. आता ही प्रक्रिया आणखी पारदर्शक, प्रतिष्ठित, निर्विवाद, न्याय्य आणि औचित्यपूर्ण करण्यासाठी जे जे करावं लागेल, ते ते करण्याची-घडवण्याची दक्षताही घेतली जावी, अशीही समाजाची अपेक्षा आहे.

आदरणीय नयनतारा सहगल इथे आलेल्या आहेत. वयाची नव्वदी पार केल्यानंतरही केवळ महाराष्ट्रातल्या या निमंत्रणाचा आदर करण्यासाठी त्या इथे आल्या आहेत. त्या भारतीय पातळीवरच्या महत्त्वाच्या लेखिका आहेत आणि वाङ्मयव्यवहारात अत्यंत सजगतेनं वावरणाऱ्या, नागरिक म्हणून आणि लेखक म्हणून स्वातंत्र्याचं मोल जाणणाऱ्या, त्यासाठी ताठ

कण्यानं उभ्या राहिलेल्या लेखिका आहेत; पण तेवढ्याच महत्त्वाची आणि आनंदाची गोष्ट म्हणजे मराठी मातीशी त्यांचं मौलिक नातं आहे आणि ते ज्ञानवंतांच्या घराण्यातून पुढे आलेलं नातं आहे.

त्यांचे चुलत आजोबा शंकर पांडुरंग पंडित हे गेल्या शतकातले मान्यवर वेदाभ्यासक. कोकणातल्या एका आडगावी जन्मलेले. शिष्यवृत्त्यांवर शिकलेले. इंग्रजी आणि लॅटिनसह संस्कृतवर उत्तम प्रभुत्व असणारे. त्या काळातले दक्षिणा फेलो, ओरिएन्टल ट्रान्सलेटर, डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर, पोरबंदरचे ॲडमिनिस्ट्रेटर. त्यांचं सर्वांत महत्त्वाचं काम म्हणजे त्यांनी ऋग्वेदाचं केलेलं मराठी आणि इंग्रजी, सटीक भाषांतर. अथर्ववेदाचाही उत्तम अभ्यास त्यांनी केला होता. शिवाय विष्णुशास्त्री पंडितांनी संपादित केलेली तुकारामगाथा त्यांनी पुन:संशोधित करून पाठभेद चिकित्सेसह प्रसिद्ध केली. या शंकर पांडुरंगांचा वारसा त्यांच्या वंशजांनी पुढे नेला. त्यांची मुलगी क्षमा राव हीसुद्धा उत्तम संस्कृतज्ञ होती. त्यांचे त्या काळातल्या नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेले लेख आणि फोटोही मी पाहिले आहेत. एका ओरिएन्टल काँग्रेसचा सगळा वृत्तान्त त्यांनी थेट पद्यमय संस्कृतात लिहून प्रसिद्ध केला आहे. ती लहानशी पुस्तिकाही आज आमच्या संग्रहात आहे.

रणजित सीताराम पंडित हे शंकर पांडुरंग यांचे पुतणे. नेहरु घराण्यातल्या विजयालक्ष्मीशी त्यांचा विवाह झाला. आणि नयनतारा या त्यांच्या कन्या. म्हणजे ही पंडित नेहरुंची भाची. स्वातंत्र्य चळवळीत तुरुंगवास भोगणाऱ्या आणि तुरुंगात असतानाच बाराव्या शतकातल्या काश्मीरच्या कवी कल्हणाची 'राजतरंगिणी' इंग्रजीत अनुवादित करणाऱ्या रणजित पंडितांचा अनुवंश त्या रक्तात वागवणाऱ्या आहेत. प्रशांत तळणीकरांबरोबर मी मराठीत अनुवादलेल्या 'राजतरंगिणी'ला त्यांनी अगदी लहानसं मनोगत जोडलं आहे. त्यांचं इथे उपस्थित असणं ही केवळ मराठी लेखिकांसाठीच नव्हे, तर सगळ्याच ज्ञानोपासक विश्वासाठी आनंदाची गोष्ट आहे.

आणखी दोन आनंदयोगांविषयी मला सांगायचं आहे. यवतमाळला १९७३ मध्ये झालेल्या ४९व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष गदिमा होते. आज पुन्हा गदिमांच्या जन्मशताब्दी वर्षात यवतमाळला हे संमेलन होत असताना मराठी भावगीतांची परंपरा समृद्ध करणाऱ्या गदिमांविषयीचं ऋण मनात वागवीत मी इथे उभी आहे आणि हा मराठी श्रवणपरंपरेच्या,

गीतपरंपरेच्या समृद्धीचा गौरव आहे अशी माझी भावना आहे.

दुसरा योगही विशेष आहे. या संमेलनाची स्थानिक निमंत्रक संस्था ही वि. भि. कोलत्यांच्या - भाऊसाहेब कोलत्यांच्या नावानं ओळखली जाणारी संस्था आहे. वा. वि. मिराशी काय किंवा भाऊसाहेब कोलते काय, विदर्भभूमीवर कार्यरत झालेल्या यांच्यासारख्या संशोधकांनी मध्ययुगीन महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास साक्षेपानं धांडोळला आहे.

## ज्ञानोपासकांची परंपरा

संस्कृतिसंशोधनाचा व्यवहार दोन पातळ्यांवर चालत असतो. तात्कालिक महत्त्वाच्या प्रश्नांशी निगडित अशा पातळीवरचा एक व्यवहार आणि तात्कालिकपेक्षाही कालनिरपेक्ष, दीर्घजीवी अशा पातळीवरचा दुसरा व्यवहार. या दोन्ही पातळ्यांवर थोरले काम करणाऱ्या संशोधकांची-ज्ञानोपासकांची एक मोठी परंपरा महाराष्ट्राला-मराठीला लाभली आहे. या ज्ञानोपासकांनी महाराष्ट्रसंस्कृतीची जडणघडण अनेक बाजूंनी तपासली आहे. आपल्याकडे डोंगराएवढं काम एकेकट्यानं करून गेलेली माणसं आहेत. अशा माणसांची एक परंपराच आहे. पण आपण त्या माणसांबरोबरच त्यांचं कामही सहज बाजूला करत, विस्मरणात टाकत पुढे येत राहिलो आहोत.

आपण माणूस म्हणूनच काय, पण लेखक म्हणूनही स्वयंभू उगवून आलेले किंवा अवतरलेले नसतो. त्यामुळे परंपरेनं काय काय भलं आणि बुरंही जन्माला घातलं आहे, याचं एक ऐतिहासिक भान वर्तमान जगणाऱ्या आणि भविष्याचा वेध घेऊ पाहणाऱ्या कोणाही लिहित्या-वाचत्या जगातल्या माणसाला असलं पाहिजे.

तसं भान ठेवून आपापल्या प्रातिभ धर्मानुसार आधुनिकतेचे, वर्तमान जगण्याचे पेच मांडणाऱ्या मोठ्या ताकदीच्या साहित्यकारांनीसुद्धा पुढे जाताना मागच्याचं काय केलं हे आपण नीट समजून घेतलं पाहिजे.

'श्रीज्ञानेश्वरसमाधिवर्णन' किंवा 'द्रोण' किंवा 'भिजकी वही' लिहिणारे अरुण कोलटकर, तुकारामाचा नवा अर्थबोध घडवणारे दिलीप चित्रे किंवा अमृतानुभवाचं अर्वाचिनीकरण करणारे आणि 'अष्टदर्शनं' लिहिणारे विंदा काय करत होते, जुन्या शाक्त परंपरेला नवा सार्थ शब्द देणारे पु. शि. रेगे काय करत होते, गौतम बुद्धांना साक्षी ठेवून आपल्या आक्रोशाला आणि

विद्रोहाला शब्द देणारे सर्व दलित कवी आणि लेखक काय करत होते, 'संस्कार' लिहिणाऱ्या अनंतमूर्तींनी किंवा 'पर्व' लिहिणाऱ्या भैरप्पांनी काय केलं आहे किंवा ललितेतर क्षेत्रात हजारीप्रसाद द्विवेदी, देवीप्रसाद चट्टोपाध्याय, वासुदेवशरण अग्रवालांपासून धर्मानंद कोसांबी, रोमिला थापर, सुधीर कक्करांपर्यंत किंवा श्रीधर व्यंकटेश केतकर, दि. के. बेडेकर, सदाशिव डांगे, नरहर कुरुंदकर, दुर्गाबाई-इरावतीबाईंपर्यंतच्या विद्वान साहित्यकारांनी आपल्यासमोर काय ठेवलं आहे याचं नीट आकलन आपण करून घेतलं पाहिजे.

शिवाय केवळ या साहित्यकारांनी आपल्या सांस्कृतिक परंपरांचं काय केलं एवढाच विचार करून भागणार नाही. परंपरा आणि नवता यांचे पेच इतरही अनेक क्षेत्रांतल्या गंभीर कलोपासक माणसांनी कसे स्वीकारले आहेत आणि संघर्ष-समन्वयाच्या कोणत्या भूमीवरून ते पुढे गेले आहेत याकडेही लक्ष दिलं पाहिजे. अमृता शेरगील, सत्यजित राय, सी. शिवराममूर्ती, कुमार गंधर्व किंवा ऋत्विक घटक यांनी आपापल्या कर्मक्षेत्रात काय केलं, आपापल्या पद्धतीनं तेंडुलकरांनी किंवा महेश एलकुंचवारांनी आपल्या नाट्यपरंपरेचं काय केलं, रोहिणीताईंनी नृत्यपरंपरेचं काय केलं, अगदी नव्या पिढीच्या प्रयोगांची धडपड पाहायची तर आजच्या प्राजक्त देशमुखनं 'देवबाभळी'मध्ये काय केलं, असा एक संस्कृतिसंबद्ध विचार केला, तर परंपरांचं पुनर्वाचन आणि पुनर्नवीकरण करण्याची एक प्रक्रिया चालू आहे असं आपल्या लक्षात येतं आणि परिवर्तनाच्या पृष्ठस्तरीय सामाजिक प्रश्नांशी जोडलेल्या थराखालून ती अखंड, सातत्याने चालू आहे असंही ध्यानात येतं. इतिहास पुनर्रचित करावा लागतोच. आपल्या कालभानानुसार त्याची विधायक पुनर्रचना करणं हे जाणत्या प्रतिभावंतांनी आपल्या निर्मितीतून अनेक वेळा केलेलं सहजकर्म आहे.

## मिथक आणि समाजपरिवर्तन

कोणतीही संस्कृती ही मानवी जीवनातूनच आकाराला आलेली आणि जीवनाइतकीच रंगीत गुंतागुंतीची गोष्ट आहे. तिच्यातून टिकाऊ आणि दीर्घजीवी असं पुष्कळ काही जन्म घेतं आणि टाकाऊ, निरुपयोगी, कालसापेक्ष असंही पुष्कळ काही निर्माण होत राहतं. या 'पुष्कळ काही'मध्ये जशा समाजरचना, धर्मकल्पना, दैवतं आणि त्यांच्या उपासना,

समाजघटकांचे (उदा. स्त्रीपुरुषांचे इ.) परस्परसंबंध, आर्थिक व्यवस्था, सत्ता आणि सत्तेच्या परिसंस्था समाविष्ट असतात, तशाच या सर्वांकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन, विविध धारणा आणि मूल्यसंकल्पनाही निर्माण होत असतात.

संस्कृतीत सामावणाऱ्या या मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही घटकांचं प्रधान लक्षण म्हणजे परिवर्तनशीलता. संस्कृतीच्या प्रवाहात जन्माला आलेल्या मिथकांचा आणि प्रतीकांचाही परिवर्तनशीलता हाच प्राणकोष असतो आणि मिथकं समाजच निर्माण करत असतो. अनेकदा कोणा एकानं निर्माण केलेली एखादी कलाकृती, साहित्यकृती किंवा एखादी निखळ कृती किंवा एखादी घटनासुद्धा मिथकाचं रूप पावते.

मानवी जीवनावरही मिथकांचा प्रभाव विलक्षण आहे. त्याचा वापर अनेकदा दुधारी शस्त्रासारखा केला गेला आहे. धर्मक्षेत्रातल्या सत्तासंपादनासाठी आणि व्यवहारसाधनासाठी वेगवेगळ्या दैवतमाहात्म्यकथा, देवावतरणकथा आणि स्थानमाहात्म्यकथांचा वापर कसा केला गेला आहे, या संबंधीचा उत्तम अभ्यास माझ्या वडलांच्या - रा. चिं. ढेरे यांच्या सर्वच लेखनातून पुढे आला आहे. अभिजन-बहुजन संबंधांत सत्ता आणि प्रतिष्ठा यांच्या संपादनासाठी आणि दृढीकरणासाठी मिथकं कशी वापरली गेली आणि त्यांच्या विरोधातली हत्यारं म्हणूनही मिथकं कशी वापरली गेली याची कितीतरी उदाहरणं वर्तमान जीवनातही अगदी अर्थकारणासह अनेक क्षेत्रांमधून देता येतील.

खरं तर संस्कृती हा मिथकांचा महाकोश असतो. समाजाला हितकर आणि पथ्यकर असलेल्या कित्येक विचारांच्या, चळवळींच्या, संस्थांच्या वा व्यक्तींच्या प्रतिष्ठापनेसाठी किंवा प्रतिष्ठावर्धनासाठी जाणत्या प्रागतिकांनीही मिथकांचा वापर केला आहे. गांधीजींनी मूठभर मीठ उचललं आणि एका बलाढ्य साम्राज्याची एका परतंत्र देशावरची पकड ढिली झाली. आणि आज आपण पाहतो आहोत की गांधीजी हेच आज एक मिथकीय व्यक्ती झाले आहेत. देशाच्या स्वातंत्र्याबरोबर गांधीजींचं राजकीय मर्यादेतलं व्यक्तिमत्त्व मर्यादामुक्त झालं. संघर्षापलीकडे एक अहिंसेची, सत्याग्रहाची शांततामय भूमी आहे असं सांगत माणसाला त्या भूमीकडे चालवणारे गांधीजी संपूर्ण जगाला आत्मिक समाधानाकडे नेणाऱ्या वाटेवरचे नायक झाले, मिथक झाले. केवळ व्यवस्थेत परिवर्तन होणं गांधीजींना अभिप्रेत

नव्हतं. व्यक्तिपरिवर्तन झाल्याशिवाय व्यवस्थापरिवर्तन टिकणार नाही; सफळ होणार नाही हे परिवर्तनाचं आत्मसूत्र केवळ भारतालाच नव्हे, तर जगालाही देणारे गांधीजी म्हणजे भारतीय भूमीने अखिल जगाला दिलेलं महामिथक आहे.

मात्र अशी कोणतीही मिथकं म्हणजे परिवर्तनाच्या वाटेवर लावलेल्या ताठर आणि निर्जीव परंपरांच्या पिंजऱ्यांमधली आमिषं होता कामा नयेत यासाठी विचारशील माणसांनी कायम सावध राहण्याची गरज असते. इतिहास मोठा आहे, आणि तो जसा गौरवशाली आहे, तसा वेदनादायक आणि हिंसकही आहे. संस्कृतीही मोठीच आहे, उदार आहे तशी अनुदार आणि क्रूरही आहे. कारण शेवटी ती माणसांचीच निर्मिती आहे. मात्र वर्तमान जीवन त्या दोहोंहून मोठं आहे, माणूस त्याहून महत्त्वाचा आहे आणि भविष्य त्याहून गौरवशाली, न्यायपूर्ण आणि सुखमय बनवायचं आहे, या धारणेनं पुढे जात राहिलं पाहिजे. वाङ्मयक्षेत्रातही ती धारणा आपण कायम ठेवली पाहिजे. माणसांसाठी मृत गोष्टींचा त्याग ही नैसर्गिक प्रक्रियाच असते. कलावंत आणि साहित्यकारांच्या बाबतीतही हीच प्रक्रिया चालू असली पाहिजे.

## कलांचे आंतरसंबंध

माणसाला मिळालेलं कलेचं सर्वांत मोठं देणं हे की ती तुम्हाला मुक्त करते. कलेच्या द्वारे येणारा मुक्ततेचा अनुभव हाच अनेकदा सच्च्या कलावंताच्या निर्मितीमागचा दृश्य-अदृश्य ध्यास असतो आणि बहुधा कलांचे आंतरसंबंध या ध्यासाला केंद्र करूनच विणले जातात. कारण जीवनाच्या एकाच जलाशयाचं पाणी हे लोक आपापल्या निर्मितीच्या घटात भरून घेत असतात.

कलांच्या या परस्परसंबंधाविषयीची विष्णुधर्मोत्तर पुराणातली एक कथा एका अभ्यासकाने एकदा ऐकवली होती. मार्कंडेय ऋषींना कोणा एका राजाने म्हटलं की 'मला शिल्पकार व्हायचं आहे, मी काय करावं?' त्यावर ते म्हणाले की, 'अरे, मग तुला आधी नृत्य शिकलं पाहिजे; कारण नृत्य हे गतिमान शिल्प असतं किंवा शिल्प हे गोठलेलं नृत्य असतं.'

राजा म्हणाला, ''ठीक आहे. मग मी आधी नृत्य शिकतो.'' त्यावर ते म्हणाले, ''नृत्य असं नाही शिकता येणार तुला. एखादं वाद्य आधी

शिकावं लागेल. कारण वादनाच्या तालावरच नृत्य केलं जातं.'' मग त्यानं वाद्य आधी शिकण्याचा मनोदय व्यक्त केला. तेव्हा ते म्हणाले की, ''मग गीत शिकल्याशिवाय वाद्यवादन उपयोगी ठरणार नाही.''

ऋषींना या एकमेकांत गुंतलेल्या कलांच्या कड्या दिसत होत्या. आपल्यालाही दिसत आल्या आहेत. साहित्याचा आनंद घेताना हे संबंध समजून घेत तो आनंद समृद्ध करत नेला पाहिजे.

आपण सगळे एका वाङ्मयीन विश्वाचे घटक आहोत आणि वाङ्मयविश्वाचं आज जे काही भलं-बुरं स्वरूप आहे, त्याला आपण सगळेच - लेखक, प्रकाशक, पुस्तक विक्रेते आणि वाचक जबाबदार आहोत.

आजचा 'काळ तर मोठा कठीण आला' आहे. नव्या युगातल्या आजच्या साहित्यकाराला कितीतरी सामाजिक-सांस्कृतिक आणि नैतिक आव्हानांना सामोरं जावं लागत आहे. केवळ कलात्मक आनंद हेच साहित्याचं अंतिम उद्दिष्ट असं मानून आज चालणार नाही. आजचे नवे साहित्यकार समकालीन वास्तवाचा वेध अतिशय सामर्थ्याने घेत आहेत, पण मनुष्यजीवनापुढे ठाकलेल्या प्रश्नांचं स्वरूप इतकं गुंतागुंतीचं आणि इतकं जगड्व्याळ आहे की द्रष्ट्याच्या पदावर आरूढ होणं साहित्यकाराला फार कठीण झालं आहे आणि निर्मितीतली सर्वस्पर्शी आवाहकता टिकवणंही अवघड झालं आहे.

साहित्यावर वर्तमानाचं वजन असं आहे आणि बौद्धिकतेचा अतिरिक्त दाबही असा आहे की आपलं माध्यम स्वत:ची एक अपूर्व आणि सशक्त भाषा कशी निर्माण करतं, भवतीच्या कल्लोळातून सृष्टिघटकांची लय ते कशी पकडतं आणि लौकिकामधलं अलौकिक असं काही त्याच्या ओंजळीत कसं येऊ शकतं याच्या प्रत्ययावर केंद्रिभूत होणं आज साहित्यकाराला - किंबहुना कोणाही कलावंताला अवघड होत आहे.

## विसंगतींनी भरलेलं शतक

हे शतक विसंगतींनी भरलेलं शतक म्हणता येईल. एका बाजूने यंत्रांच्या मदतीने माणूस अखंड कृत्रिम जग उभारण्यात गुंतला आहे; पण दुसऱ्या बाजूने त्याला जिवंत, अकृत्रिम, अनावृत्त अशा जीवनाची आस आहे. एकीकडे तो नैसर्गिक जगण्यापासून दूर गेला आहे; निसर्गापासून

तुटून निघाला आहे. कृत्रिम, आभासी जगातल्या जादुई नगरीत शिरला आहे आणि दुसरीकडे आंतरिक ओसाडीत ओलावा निर्माण करणारे खरेखुरे मानवी संबंध त्याला हवे आहेत.

खरं म्हणजे द्वंद्वांच्या अतीत जाणाऱ्या अनेक वाटा मोकळ्या करणाऱ्या तत्त्वप्रणाली आपल्याकडे निर्माण झाल्या पण आधुनिक जगाने जन्माला घातलेली जी द्वंद्वं आहेत – उदाहरणार्थ, विज्ञान आणि अध्यात्म, राष्ट्र, धर्म आणि मानवी मूल्यं, जातीयता आणि सर्वसमानता – यांच्या पलीकडे जाण्याचे सर्वमान्य आणि सर्वजनसुलभ असे रस्ते माणसाला अजून सापडलेले नाहीत.

अशा वेळी आत्यंतिक स्वार्थपरायण आणि स्पर्धात्म झालेला व्यक्तिवाद हे साहित्याचा परीघ आक्रसत जाण्याचं एक मुख्य कारण आपल्याला दिसतं. एकोणिसाव्या शतकात जन्माला आलेल्या व्यक्तिवादाने अनेक कल्याणकारी गोष्टी जगभर घडवल्या; पण आज व्यक्तिवादाचा अतिरेक माणसाचं मानसिक-वैचारिक जग स्वार्थकेंद्रित आणि आत्मकेंद्रित – पर्यायानं लहान करण्यात परिणत झाला आहे.

मराठीत साठोत्तरी साहित्यानं केलेल्या विद्रोहात इतर अनेक गोष्टींबरोबरच या आक्रसल्या परिघाला पहिला जबरदस्त नकार दिला आणि नव्वदोत्तर साहित्यिकांच्या तरुण पिढीने तर व्यक्तिवादाने आखलेल्या जवळजवळ सगळ्या मर्यादा पार करण्याची धडपड केली.

साहित्यव्यवहारात मात्र अजूनही या स्पर्धात्मक आणि स्वार्थकेंद्री व्यक्तिवादाचा प्रभाव टिकून आहे.

### शिक्षणक्षेत्राची स्थितीगती

शिक्षणक्षेत्राचा विचारही या संदर्भापासून अलग राहू शकत नाही. ज्ञानाच्या उपासनापरंपरांची शुद्धता टिकवणं आणि त्यांचं वैविध्य टिकवणं हे पर्यावरणातलं जैववैविध्य टिकवण्याइतकंच महत्कार्य आहे याची जाणीव शिक्षणक्षेत्रातून हद्दपारच झाली आहे. जागतिकीकरणाच्या नव्या लाटेत माहिती-तंत्रज्ञानाच्या पृष्ठस्तरीय वापरामुळे व्यासंग आणि संशोधन हे शब्दही निरुपयोगी वाटू लागले आहेत. संशोधनासाठी व्यावहारिक सोयीसुविधा आणि अनेक पातळ्यांवरचा अवकाश निर्माण झाला; पण विद्यापीठीय संशोधनाचा दर्जा असमाधानकारकच राहिला आहे.

मराठी भाषेची, तिच्या प्रतिष्ठेची, तिच्यावरच्या इंग्रजीच्या आक्रमणाची चिंता आपण सगळे वारंवार व्यक्त करतो आहोत. अशी चिंता निर्माण होण्याची कारणं आणि वर्तमान मराठीच्या स्वरूपाबरोबरच त्या चिंतांच्या निराकरणाचे उपाय यांवर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून गेली चार वर्षं सातत्याने मांडणी झाली आहे. म्हणून मी त्याविषयीच्या तपशिलात शिरत नाही. मात्र मातृभाषेविषयीची आस्था प्रत्येक माणसाला वाटली पाहिजे आणि तो केवळ मराठी शाळांमधल्या शिक्षणापुरता चिंतेचा विषय न राहता प्रत्येक माणसाचा स्वत:च्या प्रेमाचा विषय झाला पाहिजे. रोजच्या व्यवहारात शक्य तितका आपल्या भाषेतून संवाद-संपर्क करणं आणि ज्ञानभाषा म्हणूनही मराठीचा वापर यत्नपूर्वक करणं ही आपली गरज बनली पाहिजे.

भाषाशिक्षणाच्या बाबतीतही विद्यार्थ्यांचं भाषाप्रेम आणि भाषिक जाण वाढवण्यासाठी उपयुक्त ठरणारी संभवक्षेत्रं आपल्या शिक्षणपद्धतीत फार कमी आहेत. भाषेचा पैस विद्यार्थ्यांच्या परिचयाचा व्हावा यासाठीचे पुरेसे आणि सक्षम प्रयत्नही अभ्यासक्रमाच्या आखणीत केले जात नाहीत. माहितीच्या महाजालातून आवश्यक ती माहिती हाती लागते खरी, पण तिची विश्वसनीयता तपासून घेण्यासाठी कोशवाङ्मयाकडे वळणं आवश्यक असल्याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी लागेल.

## वाङ्मयीन संशोधनाचं क्षेत्र

समीक्षेप्रमाणेच दर्जेदार वाङ्मयीन संशोधन सध्या क्षीण झालेलं दिसतं. मध्ययुगीन महाराष्ट्र आणि एकोणिसाव्या शतकातला – प्रबोधनपर्वातला महाराष्ट्र यांच्या वाङ्मयीन-सांस्कृतिक आकलनाचा महाप्रपंच मांडताना अनेक विद्याशाखांचा समन्वित वापर करणारे, त्यातून नवनवे वाङ्मयीन दृष्टिकोन देणारे आणि अनेक अल्पज्ञात-उपेक्षित अभ्याससाधनांना उजेडात आणून साधनक्षेत्राचा विस्तार करणारे, राजवाडे-भावे-केतकरांपासून दुर्गा भागवत-इरावती कर्वे-रा. चिं. ढेरे, प्रभाकर मांडे यांच्यापर्यंत आणि 'गावगाडा'कार त्रिं. ना. आत्र्यांपासून नांदापूरकर, सातोस्कर, श्री. रं. कुलकर्णी आणि कोलते-मिराशी, प्रियोळकर-सेतुमाधवराव पगडी आणि न. र. फाटकांपर्यंत किंवा इतिहास, पुरातत्त्व आणि साहित्य यांच्या आंतरसंबंधांची जाण ठेवून काम करणाऱ्या ग. ह. खरे, म. के.

ढवळीकरांपर्यंत किंवा समाज आणि संस्कृतीकडे पाहण्याची भावगौरव किंवा तुच्छता यांच्यापलीकडची विश्लेषक दृष्टी देणाऱ्या दामोदर धर्मानंद कोसांबी, दि. के. बेडेकर, गं. बा. सरदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मे. पुं. रेगे, नरहर कुरुंदकर, रा. ना. चव्हाण यांच्यापर्यंतचे अभ्यासक आपापल्या अभ्यासक्षेत्रात जे काम करून गेले आहेत, त्यांतून गेल्या शतकातल्या वाङ्मयाच्या जडणघडणीचेही मूलाधार स्पष्ट झाले आहेत; त्याचबरोबर वाङ्मयाभ्यासाच्या पद्धती आणि दृष्टिकोनही विकसित झाले आहेत.

मात्र वर्तमान वाङ्मयाच्या कालोचित संशोधनाचा दर्जा समाधानकारक नाही ही वस्तुस्थिती आहे. संशोधन पदवीशी आणि पदवी उपजीविकेशी बांधली गेल्याचा बऱ्याच अंशी अपरिहार्य असा तो परिणाम आहे.

## वाचकांची जबाबदारी वाढती

समीक्षेची वा संशोधनाची सशक्त साथ नसण्याच्या या काळात वाचकांवरची जबाबदारी मात्र आणखी वाढलेली आहे. केवळ आवड किंवा मनोरंजनाच्या पुढच्या पायरीवर आपलं वाचन नेण्याची गरज वर्तमानानं आपल्या बाबतीत निर्माण केली आहे.

वाचन, पुनर्वाचन, वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून वाचन आणि मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन ह्यांतून आपली अभिरुची पुढे जात राहिली पाहिजे. कारण आपली भाषिक जाण आणि वाङ्मयक्षेत्राचं व्यापक भान यांमुळे आपली, म्हणजे वाचकाची संवेदनशीलता समृद्ध होते, तसंच ते साहित्यनिर्मितीचा दर्जा उंचावण्यासाठीही अप्रत्यक्ष कारण होतं.

वाचक म्हणून आपण वाङ्मयक्षेत्रातल्या कोणत्या गोष्टी उचलून धरतो याला आज अधिक महत्त्व आहे आणि हे जाणून आपल्या वाङ्मयीन जाणिवा व्यापक, उदार आणि निखळपणे गुणग्राहक ठेवण्याची फार आवश्यकता आहे. वाङ्मयनिर्मिती ही निवळ वाङ्मयीन मूल्यांवर आधारलेली नाही. समग्र सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टीचाही तिच्यावर प्रभाव पडतो आहे. एका बाजूने जातीय, वर्गीय, धर्मीय अहंकार आणि दुसऱ्या बाजूने राजकीय डावपेच यांनी पोखरलेल्या आजच्या साहित्यसंस्कृतीचं दर्शन सावधपणे आणि विवेकानेच घेण्याची जबाबदारी वाचकांवर आहे. शिवाय वाङ्मयाचा रुंदावणारा परीघ वाचकांनी धांडोळला

पाहिजे. समकालीन भारतीय भाषांमधले साहित्यकार काय लिहिताहेत किंवा गाओ झिंग झिआंग किंवा ओरहान पामुकसारखे कितीतरी कसदार लेखन करणारे लोक जागतिक पातळीवर कोणत्या अनुभवांना भिडताहेत याची दखल आपला जाणिवेचा पैस विस्तारणारी असणार आहे.

## साहित्यकारांपुढे नवीन आव्हानं

साहित्यिकांसाठी तर निर्मितीची आव्हानं फारच मोठी आहेत. दीड–दोनशे वर्षांपूर्वी आर्थिक प्रेरणांनी प्रभावित अशा 'इकॉनॉमिक मॅन'ची संकल्पना मांडली गेली होती. तशी 'कलामानवा'ची संकल्पना आपण कधीच स्वीकारू शकणार नाही. 'कोठेतरी जाऊ, बसुनी शीघ्र विमानी । स्वातंत्र्य जिथे, शांति जिथे, प्रेम इमानी । तेथे चल राणी' अशी माधव जूलियनांच्या कवितेतली कल्पना कितीही हवीशी असली, तरी समकालीन वास्तवापासून दूर जाऊन निव्वळ कलावंत म्हणून किंवा साहित्यकार म्हणून जगणं शक्य नाही आणि योग्य तर नाहीच नाही.

गंभीरपणे निर्मितीत गुंतलेल्या समकालीन साहित्यकारांना याचं पुरेसं भान आहे. वाङ्मयेतिहासाच्या प्रदीर्घ वाटचालीत साहित्यापुढे वेळोवेळी अनेक सांस्कृतिक, सामाजिक प्रलोभनं निर्माण केली गेली आणि आपली स्वायत्तता न गमावता निर्मितीवरचा विश्वास दृढ ठेवून लिहीत राहिलेले किंवा संघर्षरत झालेले साहित्यिकही वेळोवेळी पुढे आले. रामदेवराव यादवाला आपल्या ग्रंथाच्या निर्मितीचं श्रेय न विकणाऱ्या महानुभाव कवी नरेंद्राची आठवण त्यांना वेगळी करून देण्याची गरज नाही.

'रुक्मिणीस्वयंवर'कर्ता महानुभाव नरेंद्र कवी राजापुढे आपल्या काव्याचं वाचन करीत असताना एके ठिकाणी त्याच्या काव्यातल्या अर्थपूर्ण अशा सुंदर कल्पनेपाशी त्याला थांबवून राजानं त्याला म्हटलं की, 'या ग्रंथाचा अभंगु मज देयावा' म्हणजे या ग्रंथाचं कर्तृत्व मला दे. मी तुला त्यासाठी सुवर्णमुद्रांची बक्षिसी देतो. यावर नरेंद्रानं दिलेलं उत्तर फार बोलकं होतं. तो म्हणाला, ''ना राजेहो, येणे कारणे आमुचेया कविकुळ बोलु लागैल.'' मी असं केलं, माझी साहित्यकृती अशी विकली, तर माझ्या कविकुळालाच कलंक लागेल. वाङ्मयीन व्यभिचाराला नकार देणारं नरेंद्राचं हे उत्तर तर त्याच्या अंतर्निष्ठेचं, स्वाभिमानाचं आणि व्यापकसाहित्यभानाचं दर्शन

घडवणारं आहेच; पण पुढच्या घटना तर मतस्वातंत्र्याची किंमत चुकवणाऱ्या त्याच्या धैर्याच्या आणि त्याच्या ताठ कण्याच्या निर्णयाचा परिणाम सांगणाऱ्या आहेत.

नरेंद्राचा नकार स्वीकारायला जेव्हा राजा तयार होईना आणि तो ग्रंथ दरबारातच हिरावून घेतला जाईल अशी भीती निर्माण झाली, तेव्हा नरेंद्राने 'त्या ग्रंथाचा उर्वरित अंश घरी आहे; तो एकत्र करून काही दरभर करून उद्या तुमच्या हवाली करतो' असं आश्वासन राजाला दिलं आणि ग्रंथ सुरक्षित घरी आणला. त्यानंतर आपल्या भावाच्या मदतीनं तो रातोरात शक्य तेवढा नकलला आणि राजाचे सैनिक सकाळी दारात हजर होण्याच्या आत दोघेही भाऊ राजधानी सोडून परागंदा झाले.

आपल्या साहित्यकृतीच्या पाठीशी आपण उभं राहिलंच पाहिजे. त्या निर्मितीच्या घडणीला आपल्या आयुष्याची माती लागली आहे, आपल्या अनुभवांनी ती माती आपण मळली आहे. तिच्या प्रतिष्ठेसाठी आपण पडेल ती किंमत चुकवली पाहिजे याची जाणीव नरेंद्राने करून दिली आहे.

या निमित्तानं हेही आपल्या लक्षात येईल की वाङ्मयाला समाजात नेहमीच एक सत्तानिरपेक्ष सामर्थ्य असतं आणि राजकीय हेतूनं ते सामर्थ्य वापरण्याचे किंवा ते सामर्थ्य खच्ची करण्याचे प्रयत्नही अनेकदा राजकीय सत्तेकडून होत असतात.

अशा प्रयत्नांना अयशस्वी करण्यासाठी साहित्यिकांजवळ असावा लागतो तो निर्मितीविषयीचा दृढ असा विश्वास आणि आपल्या वाङ्मयीन मूल्यांवरची दृढ अशी निष्ठा. ही मूल्यं मनुष्यजीवनाच्या विरोधात नाहीत आणि सर्वकल्याणकारीच आहेत अशा आंतरिक प्रत्ययानं लिहिणारा साहित्यकार वेळप्रसंगी निषेध, नकार, चळवळी, आंदोलनं अशी हत्यारं वापरतो आणि सर्वांसाठी लढणं म्हणजे शेवटी सर्वांच्या एकमय सुखशांतीसाठी लढणं हेच त्याचं उद्दिष्ट असतं.

खरं तर साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस असला पाहिजे, यासाठी लेखक-कवींनी वारंवार लढाई केली. ती त्यांना करावीच लागली. आधुनिक काळात केशवसुतांनी ती केली, मर्ढेकरांनी केली, लघु-अनियतकालिकांनी केली, दलित, शोषित, वंचितांनी केली, स्त्रियांनीही केली.

ही लढाई जशी अस्तित्वासाठी होती तशीच वेगवेगळ्या प्रकारच्या स्वातंत्र्यासाठीही होती. त्या लढाईत समकालीन जगण्याचा, त्यातल्या गुंतागुंतीचा, अवघडपणाचा, विसंवादाचा अनुभव देताना पुष्कळ किंमतही विचारवंतांना, कलावंतांना आणि लेखकांना चुकवावी लागली आहे. शिवाय अंतर्दृष्टी असलेल्या विद्रोहाचीही या देशात एक परंपरा आहे. तिचे अन्वयार्थ शोधत त्याच्याशी नाळ जुळवावी लागली आहे.तिथून या लढाईसाठी बळ मिळवावं लागलं आहे.

## बहुविध ज्ञानपरंपरा आणि विद्रोह

भारतासारख्या देशात, जिथे वेगवेगळे लोकसमूह हजारो वर्षं एकत्र नांदत आले, तिथे केवळ भाषिक बहुविधताच नव्हे, तर ज्ञानपरंपरांची बहुविधताही दीर्घकाळ नांदत आली. ज्ञानसंपादन, ज्ञानव्यवस्थापन आणि ज्ञानप्रसारण यांच्या प्रत्येक जनसमूहाच्या स्वतंत्र व्यवस्था अस्तित्वात येत गेल्या. भाषा आणि साहित्यही या व्यवस्थांशी निगडित झालं.

या व्यवस्था लवचिक होत्या. जगताना येणाऱ्या प्रत्यक्ष अनुभवांतून निर्माण झालेल्या होत्या. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते अनुभवजन्य ज्ञान संक्रांत करण्याची साधनंही त्या व्यवस्थेत निर्माण केली जात होती. ज्ञान सृष्टीसंबंधीचं असो, कालौघात निर्माण होत गेलेल्या सामाजिक संस्थांविषयीचं असो, समूहाविषयीचं असो, कुटुंबाविषयीचं असो की मानवी संबंधांविषयीचं असो; परंपरेनं हे ज्ञान वितरित होत होतं. ते ज्ञान जगण्यासंबंधीचंच असल्यामुळे आपोआप जगण्यामधली लवचिकता, परिवर्तनशीलता आणि गतिशीलताही त्या परंपरेत होती आणि जिवंतपणाही होता. व्यक्तीचं जगणं आणि समूहाचं जगणं यासंबंधीच्या त्या त्या समाजात निर्माण झालेल्या धारणांचं आणि नीतीनियमांचं ज्ञानही परंपरेनं माणसांना ठाऊक होत होतं.

अभिजनांकडून जेव्हा त्यांच्या विशिष्ट ज्ञानपरंपरा सत्तासंपादनाचं माध्यम म्हणून वापरल्या गेल्या, तेव्हा त्यांच्या ज्ञानसंपादनाच्या, व्यवस्थापनाच्या, प्रसारणाच्या साधनांवर त्यांनी पूर्णपणे आपली पकड ठेवली; त्यांना अधिक प्रतिष्ठित, अधिक गौरवशाली स्वरूप दिलं आणि अधिक मोकळ्या, अधिक नैसर्गिक, जीवनसंबद्ध आणि सृष्टीशी संवाद साधणाऱ्या जिवंत अशा अनेक लहान लहान समूहांच्या ज्ञानपरंपरा गौण

ठरल्या, उपेक्षित राहिल्या आणि क्षीणबलही झाल्या.

अभिजनवर्गानं समाजनियंत्रणासाठी या ज्ञानपरंपरांना अधिक बुद्धिनिष्ठ तर बनवलंच, पण कृत्रिमही बनवलं. मात्र इथल्या अनुभवजन्य ज्ञानावर आधारलेल्या जीवनसंबद्ध बहुजन परंपरांनी स्वत:च्या आंतरिक सामर्थ्यावर संस्कृतिसातत्य टिकवून ठेवलं. बुद्धिप्रामाण्यापेक्षा अनुभवप्रामाण्यावर पुढे जाणाऱ्या या परंपरा प्रवाही राहिल्या. आंतरिक गतिशीलता हे त्यांचं व्यवच्छेदक लक्षण. त्यामुळे त्यांच्याबाबतीत प्रामाण्यांचे पिंजरे झाले नाहीत. अशा विशिष्ट प्रामाण्यांच्या पिंजऱ्यात समाजाला बंदिस्त करणाऱ्यांविरुद्ध कधी बुद्ध तर कधी चार्वाक उभे राहिलेले आपल्याला दिसतातच.

## संतांचा विद्रोह

मध्ययुगात सबंध भारतात जी भक्तिचळवळ उभी राहिली, ती अशी अभिजनांनी सत्ताकारणासाठी वापरलेल्या आणि सामाजिक, सांस्कृतिक अभिसरणाला नकार देणाऱ्या ताठर ज्ञानपरंपरांविरुद्ध एक कसदार, अर्थपूर्ण द्रोह करण्यासाठी उभी राहिली. भाषा आणि साहित्य हे या द्रोहाचं एक हत्यारही होतं आणि माध्यमही होतं. सांस्कृतिक बहुकेंद्रिततेचा अभिमान प्रकट करणाऱ्या आणि भाषेच्या, साहित्याच्या रूपानं जीवनसंबद्धतेचा, जीवनाच्या बहुविधतेचा आणि ज्याला अनेकदा संतांनी 'सत्य' म्हणून संबोधलं आहे, त्या अनुभवप्रामाण्याचा निर्भय उच्चार करणारे संत हे सर्वांत मोठे विद्रोही होते.

'त्या बड्या बंडवाल्यांत ज्ञानेश्वर माने पहिला' असं म्हणताना बी कवींना ज्ञानेश्वरांनी केलेल्या विद्रोहाचा सर्वंकष अर्थ अभिप्रेत होता की नाही, माहीत नाही; पण ज्ञानेश्वर–तुकारामांसह सर्वच संतांची विद्रोहाची परिभाषा वेगळी असली, तरी त्यांनी पूर्वप्रतिष्ठित ज्ञानव्यवस्थेतली विषमता आणि ताठरता दूर करून तिचं सुलभीकरण केलं; असं म्हणण्यापेक्षा त्यांनी ती ज्ञानव्यवस्था दूर सारली आणि एक नवी – संपूर्ण नवी ज्ञानव्यवस्थाच निर्माण केली.

या व्यवस्थेसाठी त्यांनी नवं साहित्य निर्माण केलं. ज्ञानप्रसारासाठी नवी भाषा वापरली, कीर्तन–प्रवचन–नामस्मरण–भजनासारखी नवी साधनं आवश्यकतेनुसार पुनर्रचित केली आणि संपर्कमाध्यमं म्हणून ती सक्षमही केली. धर्माधिष्ठित ज्ञानापेक्षा अनुभवजन्य ज्ञान महत्त्वाचं मानलं आणि

समाजाची एकमयता, समाजाचं एकरसीकरण - महात्मा फुल्यांचा शब्द वापरायचा तर एकमय असणं, त्यासाठी परस्परसौहार्द निर्माण झालेलं असणं हे महत्त्वाचं मानलं आणि हे सौहार्द केवळ एका जनसमूहामधलं नव्हे, एकदेशीय समाजापुरतं नव्हे, तर अखिल विश्वातल्या माणसांमधलं, एवढचं नव्हे तर माणूस आणि सृष्टीमधलं सौहार्द त्यांना अभिप्रेत होतं.

गतिशील अशा लोकसांस्कृतिक मूल्यांचं नव्या परंपरेत झालेलं पुनर्घटन ही संतसंस्कृतीची आपल्याला मिळालेली सर्वांत मोठी देणगी आहे. या मूल्यांच्या उच्चाराची प्रत्येक संताची परिभाषा ज्याच्या त्याच्या प्रकृतीनुसार वेगळी आहे. पण अंतिमत: त्यांच्या विद्रोहाचा उद्देश एकच आहे. नव्या समाजहितैषी मूल्यसंघाताची प्रतिष्ठापना. आणि ही मूल्यं म्हणजे आधुनिक युगात ज्यांचा उच्चार युगसापेक्ष नव्या संदर्भांनी नवा होतो, तीच आहेत - स्त्री-पुरुष समानता, स्वातंत्र्य, समता, बंधुता, वैयक्तिक आणि सार्वजनिक नीतिमत्ता आणि विश्वात्मकता. संतांच्या विद्रोहाच्या तत्कालीन सामाजिक संदर्भातल्या मर्यादा मान्य करूनही त्या मूल्यांचं महत्त्व अबाधितच राहतं. बाह्य गतिशीलतेचं लक्ष्य झालेल्या आणि आंतरिक गतिशीलता गमावत चाललेल्या आजच्या समाजात या मूल्यांचं केवळ मौखिक नव्हे, तर आत्मिक जागरण झालं पाहिजे. एके काळी धर्माच्या आधाराने नीतिव्यवस्था उभी होती. आता धर्माधिष्ठित व्यवस्था दूर सारल्यावर सार्वजनिक आणि वैयक्तिक नीतीची नवी व्यवस्था निर्माण करणं हीसुद्धा परिवर्तनातली मोठी गरज आहे.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्य

त्या काळी जात, वर्ग, वर्ण, स्त्री-पुरुष - सर्व प्रकारचे भेद संतांनी दूर सारले आणि ज्ञानाधिष्ठित अशा सर्वसमावेशक विश्वसंस्कृतीची घडण कोणत्या मूल्यांच्या आधारे होऊ शकते याचा वस्तुपाठ निर्माण केला.

शिवाय या मूल्यसंघातासाठी संतांनी चुकवलेली किंमतही दृष्टीआड होता कामा नये. खरं तर प्रत्येक विद्रोही माणसाने अशी किंमत आजवर चुकवलेलीच आहे आणि ती चुकवावीच लागते. ही अभिव्यक्तीस्वातंत्र्याची किंमत तर आहेच, पण त्यापेक्षा कितीतरी अधिक गोष्टी त्यात सामावल्या आहेत, याची जाणीव विवेकी परिवर्तनवाद्यांनीही जागती ठेवण्याची गरज आहे.

कोणत्याही सत्ताकारणासाठी स्थितिशीलता आवश्यक असते आणि जीवन तर अखंड प्रवाही, अखंड गतिशील असतं. त्यामुळे व्यवस्थेला घट्ट करीत जीवनाला बांध घालणारे आणि गती रोखणारे जसे समाजकारणात आणि संस्कृतिकारणात सक्रिय असतात, तसे ते बांध फोडून जीवनाला मुक्त करणारे आणि सर्वजनहिताला अनुकूल अशी प्रवाहाला गती देणारेही सक्रिय असतात. या दोहोंच्या संघर्ष-समन्वयातून परिवर्तनाचा वेग आणि दिशाही ठरत असते.

## दुसरं प्रबोधनपर्व

गेलं संपूर्ण अर्धं शतक, आपण या संघर्षाची वेगवेगळी रूपं पाहत, अनुभवत आलो आहोत. या कालखंडाला दुसरं प्रबोधनपर्व असं मला म्हणावंसं वाटत आहे आणि हे सर्वंकष परिवर्तनाचं घटित आहे. केवळ महाराष्ट्रापुरतं हे नाही, केवळ भारतापुरतं नाही, तर हे जागतिक पातळीवरचं प्रबोधनपर्व आहे. त्याची सुरुवात विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच झाली आहे. महाराष्ट्रापुरतं बोलायचं झालं तर एकोणिसाव्या शतकात जे प्रबोधन झालं, त्या वेळी ते इंग्रजी भाषा-विद्या-कला-संस्कृतीच्या परिचयातून झालं. तेव्हा सत्ताधारी इंग्रज होते आणि ते जसे प्रबोधनाला कारण झाले होते, तसे प्रबोधनाच्या एतद्देशीय स्वरूपाचेही कारण झाले होते. प्रबोधनाच्या अनेक माध्यमांवर त्यांची पकड होती आणि त्या माध्यमांच्या वापरामागे असलेला दृष्टिकोनही त्यांनी प्रभावित केलेला होता. त्यामुळे शिक्षणासकट इथल्या बहुतेक सामाजिक संस्था आणि प्रबोधनाच्या चळवळी एतद्देशीय पद्धतीने विकसित झाल्या नाहीत आणि पुरेशा फलदायीही ठरल्या नाहीत.

ते प्रबोधन मुख्यत: सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातलं प्रबोधन होतं. विसाव्या शतकाच्या अखेरपासून विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विलक्षण वेगवान प्रगतीनं जे जागतिकीकरणाचं वादळ आणलं आहे, ते मात्र सर्व जीवनक्षेत्रांची उलथापालथ करणारं आहे. प्रत्येक क्षेत्रातल्या त्याच्या सुट्या सुट्या परिणामांविषयी आपण बोलत आहोत; पण या परिवर्तनाचं समग्र चित्र डोळ्यांसमोर ठेवण्याची आवश्यकता आहे.

गतिशीलता आणि परिवर्तन हा जीवनाचा स्थायीभावच आहे. जीवन अविरत बदलत राहतं. मात्र आज जे बदल होत आहेत ते विराट आहेत, अनाकलनीय आहेत आणि अकल्पनीयही आहेत. मूलगामी स्वरूपाच्या

या बदलांमध्ये जीवनाचा-व्यक्तिजीवनाचा आणि समूहजीवनाचाही पायाच उखडण्याची शक्ती आहे. सर्व जुन्या व्यवस्था कोलमडून पडताहेत. अर्थव्यवस्था कोसळत आहेत, समाजव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था कोलमडत आहेत. लहानमोठ्या भाषा आणि प्रादेशिक संस्कृती हेलपाटून चुरमडत चालल्या आहेत.

शासन आणि समाजाचे संबंध बदलत आहेत आणि सत्तेचं स्वरूपही बदलतं आहे. धर्मसत्ता पहिल्या प्रबोधनानंतर कोसळल्या. राजसत्ता, लोकसत्ता यांचे विविध प्रयोग जगभर झाले. आता आर्थिक सत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आणि संहारशक्तीच्या बळावर जगभर येऊ पाहते आहे.

## परिवर्तनाचे साहित्यसंबद्ध स्वरूप

साहित्यातही हे अनेक अर्थांनी कोसळण्याचं पर्व आहे. जुने रचनाबंध कोसळताहेत. अभिव्यक्तीचे जुने घाट मोडून पडताहेत. भाषिक अभिव्यक्ती कमालीची परिवर्तनशील झालेली आहे आणि मुख्यत: लेखक-वाचकांची वाङ्मयाकडे पाहण्याची दृष्टीच बदललेली आहे. हे वाङ्मयातलं प्रतिमाभंगाचं युग आहे असं म्हटलं तरी चालेल. साहित्यातले नायक अथवा नायिका एके काळी समाजाने जीवनादर्श म्हणून स्वीकारले होते. आता त्या आदर्श प्रतिमा तर भंगल्या आहेतच; पण साहित्य आणि साहित्यकार दोन्हींच्या, समाजमनातल्या प्रतिष्ठित प्रतिमाही या युगाने मोडल्या आहेत. मिथकांप्रमाणेच साहित्याच्या पुनर्वाचनाला मानुषीकरणाच्या सार्वत्रिक प्रक्रियेने वलयविध्वंसाचं बळ पुरवलं आहे.

पहिलं प्रबोधन पर्व हे पश्चिमी देशांमध्ये व्यक्तीच्या ऐहिक-भौतिक विकासाची राजवाट ठरलं. अनेक ज्ञानशाखांचा विकास घडवणारं ठरलं. नवसमाजरचनेची मूल्यं प्रबोधनाच्या घुसळणीतून त्या देशांच्या हाती लागली.

आपल्याकडे मात्र भौतिक शास्त्रांचा विकास होणं आणि स्वतंत्र, समाजसन्मुख शिक्षणपद्धती तयार होणं या दोन्ही बाबी घडल्या नाहीत. मुख्यत: पारंपरिक ज्ञानव्यवस्था सुविहित रीतीने नव्या युगाला सन्मुख करण्याची प्रक्रिया इथे अत्यंत क्षीणबल राहिली आणि हळूहळू ज्ञानाच्या प्रक्रियांची अनेकताही संपुष्टात येत गेली. केवळ वैज्ञानिक आणि केवळ तत्त्वचिंतनात्मक अशा उभय प्रक्रियांमधले संबंध विरोधाचे राहिले आणि त्याला आधुनिक आणि सनातनी असे रंग चढले.

विश्वातल्या घडामोडींचा शोध घेऊन त्याच्या कार्यकारणांची संगती लावणारी आणि प्रत्यक्ष प्रमाणांमधून हाती आलेल्या नियमांचे प्रामाण्य मानणारी वैज्ञानिक प्रक्रिया आणि विश्वाच्या उत्पत्तीचे रहस्य शोधणारी, सृष्टी आणि माणूस यांच्या संबंधाचा वेध घेणारी, मानवी जीवन श्रेयस्कर रीतीने जगण्यासाठी अधिष्ठान देण्याचे प्रयत्न करणारी तत्त्वज्ञानात्मक प्रक्रिया, या दोहोंमधून माणसाची समग्र जाणीव समृद्ध होत गेली आहे. याचं भान परिवर्तनवादी आणि परंपरावादी दोघांनीही पुरेसं ठेवलं नाही. तंत्रज्ञानामुळे अपरिहार्य ठरलेल्या जागतिकीकरणाला जोवर सांस्कृतिक अभिसरणाची जोडमिळत नाही, तोवर जग जवळ आल्याच्या पृष्ठस्पर्शी कल्पनेला दूर सारून, समाजविभाजनाची प्रक्रिया आपल्याला खऱ्या अर्थाने थांबवता येणार नाही.

मनोव्यापारांचं महत्त्व असलेल्या कित्येक सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था या नव्या वादळात कोसळल्या आहेत. विशेषत: नीतिव्यवस्था आणि पारंपरिक मूल्यव्यवस्था कोलमडल्या आहेत. अशा वेळी विश्वात्मकता हेच एक सर्वसमावेशक सत्य मूल्यभावाने स्वीकारणं आणि विश्वात्मकतेचा प्रत्यय देणाऱ्या सर्व मानुष व्यवहार–व्यापारांना अग्रभागी आणणं हाच आज विवेकी विचारवंतांचा कृतिकार्यक्रम असू शकतो. त्यात अर्थातच कलाव्यापारही आला. आज जेव्हा अतिशय बलाढ्य अशा आर्थिक व्यवहारानं जग एकत्र बांधलं जात आहे, तेव्हा माणसांमधले भेद प्रखर करणारी संघर्षरत मांडणी दूर ठेवून, महात्मा फुले ज्याला 'एकमय' शब्द वापरतात तशा, एकमय जगाकडे समाज आणि संस्कृती चालवणं कठीण असलं तरी गरजेचं आहे.

## अनुवादांना महत्त्व

साहित्यक्षेत्रात अनुवादांना याच कारणानं आज असाधारण महत्त्व आलेलं आहे. वाङ्मयीन लोकशाहीचा अभिनव प्रयोग म्हणून अनुवादाकडे आपण पाहतो आहोत खरे, पण त्याहीपलीकडे जाऊन सांस्कृतिक अभिसरण आणि वैश्विक मूल्यांचं लख्ख भान येण्यासाठी अनुवाद हे आज प्रगल्भ आणि प्रभावी माध्यम ठरत आहे. एकोणिसाव्या शतकातल्या भाषांतरयुगापेक्षा कितीतरी व्यापक, कसदार आणि ज्ञानश्रीमंत असं हे भाषांतरपर्व आहे. कदाचित आपल्या धर्मेतिहासाकडे, राष्ट्रवाद, देशीवाद

अशा संकल्पनांकडे आणि सांस्कृतिक परंपरांकडे भावगौरवाच्या पलीकडे जाऊन पाहणं आणि नव्या मानुष विश्वभावाचा स्वीकार सामंजस्यानं करणं यासाठी आपल्याला हे पर्व साहाय्यभूत ठरेल.

मनुष्यमात्रावरची श्रद्धा ही विवेकाधिष्ठित आणि ज्ञानात्मकच असते आणि ती श्रद्धाच माणसांना एकरस करण्याचं सर्वोत्कृष्ट साधन असू शकते, अशी वैचारिक मांडणी करणारे विचारवंत पुढे आले आणि त्यांचा आवाज प्रभावी झाला, तर भावनिक बाजूने कुपोषणग्रस्त आणि मानसविश्वाच्या पडझडीमुळे कमालीच्या असुरक्षित झालेल्या समाजाला मोठाच दिलासा मिळणार आहे. आपण सर्वांनीच हे ध्यानात ठेवण्याची गरज आहे.

स्वप्नं पाहण्याची व्यक्तीची आणि समाजाची ताकदही आपण उणावू देता कामा नये. कृतक् किंवा अतिरेकी भावनाशीलता नाकारताना भावनात्मक पोषण करणाऱ्या भावमधुरतेची आणि सौंदर्यभावनेची ताकद, जशी हर्मन हेसकडे होती किंवा जशी खलिल जिब्रानकडे होती, तशी ताकद आपण गमावली आहे. पर्यायानं आपल्या साहित्यानंही ती गमावली आहे. शिवाय संस्कृती, परंपरा या शब्दांचं आपल्याला भय वाटता कामा नये. त्यांच्याविषयी आपल्याला तुच्छता का वाटते? आपलं केवळ बाह्यजीवन नव्हे, तर आंतरजीवनही अनेक प्रकारच्या आंतरविरोधांनी भरलेलं जीवन आहे.

## माणूस केंद्रस्थानी ठेवण्याची गरज

विवेकी समाजविमर्शक भा. ल. भोळे यांनी परिवर्तनाचं स्वरूप उलगडताना, परंपरा आणि आधुनिकता यांचा निकोप संबंध इथे दृढ होऊ शकला नाही याविषयीची जी खंत व्यक्त केली आहे, ती मला महत्त्वाची वाटते. परंपरेतून मुक्त होणं म्हणजे परंपरा संपूर्ण नाकारणं नव्हे; तर तिच्यातल्या विकसनशील, प्रसरणशील आणि गतिशील घटकांना उचलून घेत तिच्यातल्या कालबाह्य घटकांची बेडी तोडणं आणि तिला जाणीवपूर्वक कालसापेक्ष वळण देणं, हे इथल्या परिवर्तनवाद्यांना समजलं नाही आणि सगळी आधुनिकता परंपरेत पूर्वीपासून सामावलेली आहेच, अशा आत्मतुष्टीत परंपरावादी मग्न राहिले, अशी भोळ्यांची खंत आहे. याची दखल आपण गंभीरपणे घेतली पाहिजे. आणि आपण येणाऱ्या काळाचा विचार करता हेही जाणलं पाहिजे की हे भान लेखनातून आणि प्रत्यक्ष कार्यातून घडवणाऱ्या बहुतेक विचारवंतांना महाराष्ट्राने गंभीरपणे स्वीकारलं नाही. एका बाजूने

रामकृष्ण–विवेकानंद, न्यायमूर्ती रानडे, विनोबा, साने गुरुजी यांच्यासारखे विचारवंत लोकनेते, दुसरीकडे महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराजांसारखे कृतिशील समाजसुधारक आणि इतिहासाचार्य राजवाडे, ज्ञानकोशकार केतकरांपासून गं. बा. सरदार, दि. के. बेडेकरांपर्यंतचे अभ्यासक आपल्या समाजजीवनाला तसं भान घडवण्यासाठी पुरेसे झाले नाहीत. वरवर पाहता या सर्व विचारवंताना दिखाव्यासाठी इथे एकत्र आणल्याचा भास होऊ शकेलही; पण वेगवेगळ्या मार्गांनी आणि आपापल्या पद्धतीने तेच भान प्रकट करणारे विचारवंत आहेत हेही आपल्या लक्षात येईल.

दि.के. बेडेकरांची आठवण आज वारंवार होते आहे. पूर्णपणे मार्क्सवादी असलेल्या बेडेकरांनी फार स्वच्छपणे धर्माविषयीचा अत्यंत मूलगामी विचार केला आहे. माणूस हा मन आणि बुद्धी, दोन्ही लाभलेला प्राणी आहे. अस्तित्वभान असलेला जाणीवसंपन्न प्राणी आहे आणि समुदायातच त्याला त्याचं माणूसपण प्राप्त झालेलं आहे. त्यांच्या मन:सामर्थ्याचं दर्शन धर्म, तत्त्वज्ञान, कला यांमधून समाजजीवनात आदिम काळापासून घडत आलं आहे. ऐंद्रिय अनुभवांमधून मूल्यं निर्माण होत नाहीत हे ध्यानात आल्यानंतर आदिम काळापासून धर्माचा आढळ सर्वच समाजांमधून होत आला आहे, त्यामुळे धर्मश्रद्धेची जागा विज्ञाननिष्ठेनं भरून येणारी नाही. भारतीय लोकजीवनात तर धर्म इतका ओतप्रोत भरलेला आहे की राज्यघटनेइतकेच किंवा कायद्याइतकेच धर्मादेश प्रमाण मानून ते प्राणपणाने सांभाळणारे समूह आजही अस्तित्वात आहेत. आपल्यासमोर कुरमाघरासारख्या प्रथांचं उदाहरण ताजं आहे. या समूहांची मानसिकता एका रात्रीत बदलणं शक्य नाही; पण ती बदलण्यासाठी कायद्यापलीकडच्या समंजस प्रयत्नांची गरज आहे.

संस्कृतिकारणात या वस्तुस्थितीची नुसती दखलच नव्हे, तर गंभीर चिकित्सा केल्याशिवाय आज विवेकी परंपरावाद्यांना किंवा अनाग्रही परिवर्तनवाद्यांना पुढे जाता येत नाही. धर्मवादी राजकारण हा कमालीचा संवेदनशील बनलेला विषय, आज माणूस केंद्रस्थानी ठेवून आणि सर्व प्रकारचे पूर्वग्रह सर्व पातळ्यांवरच्या हितसंबंधांइतकेच दूर ठेवून हाताळण्याची आत्यंतिक गरज आहे.

## सावध, ऐका पुढल्या हाका

आज तंत्रज्ञानातल्या, विशेषत: संपर्क क्षेत्रांतल्या नवनव्या शोधांमुळे जग एकत्र येत असल्याचा भास निर्माण झाला आहे. विशेषत: बाजारपेठेच्या पातळीवर ते एकत्र आणण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्नही होत आहेत. जागतिकीकरणात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत असा आणि त्यातल्या खऱ्या लाभांपासून वंचित असा – असे वर्ग निर्माण होऊन मुळात जातिधर्माच्या अस्मिता टोकदार करून भंगलेलं समाजमन आणखी छिन्न झालेलं आहे.

प्रबोधनाच्या या दुसऱ्या पर्वातली आव्हानं पहिल्या पर्वापेक्षा फार वेगळी, फार जगड्व्याळ आणि फार गुंतागुंतीची आहेत. भाषेचा प्रश्न त्यातलाच एक आहे. मराठी भाषेचा प्रश्न हा केवळ मराठी भाषेपुरता उरलेला नाही. मराठी संस्कृतीशी आणि पर्यायाने मराठी समाजाच्या जागतिकीकरणाविषयीच्या भूमिकेशीच तो जोडलेला आहे. मराठी समाज जागतिकीकरणाकडे आणि त्यात स्वत:च्या भाषा आणि संस्कृतीकडे कसा पाहतो याचा विचार या संदर्भात महत्त्वाचा आहे.

संस्कृतीच्या दीर्घ इतिहासात अनेक भल्याबुऱ्या गोष्टी काही जिवंत स्वरूपात आणि काही पुरावशेषांच्या–फॉसिल्सच्या स्वरूपात टिकून असतात आणि ज्याचं युगभान प्रखर आहे आणि ज्याचं समग्रतेचं भानही चौफेर आहे असा साहित्यकार–असा कलावंत कालबाह्य गोष्टींची अडगळ दूर करून विकासोन्मुख घटकांना नव्यानं प्रेरित करू शकतो. रवीन्द्रनाथ टागोरांसारख्या अनेक प्रज्ञावंत साहित्यकारांनी आजवर तसं केलंही आहे.

आजचा काळ मोठा विचित्र आहे. गेल्या शतकात जगण्याच्या तीन क्षेत्रांमध्ये फार मोठी क्रांती घडून आली. आर्थिक क्रांती, वैज्ञानिक क्रांती आणि तंत्रज्ञानात्मक क्रांती. या क्रांतीचे जे सर्वदूर परिणाम झाले त्यातला एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे महानगरांचा उदय. ग्रामजीवनाकडे परतून जाऊ न शकणाऱ्या आणि आधुनिक अर्थव्यवस्थेत पुरेशी भागीदारी मिळवू न शकणाऱ्या, पारंपरिक संस्कृतीत घट्ट मुळं नसणाऱ्या आणि आधुनिक विकासात लक्षणीय झेप घेऊ न शकलेल्या अशा दोन पिढ्या हे महानगरांचं एक ठळक वैशिष्ट्य आहे आणि महानगरीय साहित्याला आकार देणारं तेच लक्षणीय वास्तवही आहे.

मात्र एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातच तंत्रज्ञानाची प्रगती

अशा प्रकारे झाली आहे, की तिनं सर्वच साहित्यव्यवहार किंवा सर्वच कलाव्यवहार, नव्हे एकूणच सांस्कृतिक व्यवहार प्रभावित केला आहे. तंत्राच्या अजस्र पंजात दाबली जाणारी संस्कृती, असं एक श्वास रोखायला लावणारं चित्र आपल्याला दिसतं आहे. ही तंत्राची क्रांती सामाजिक दृढीकरणाला अवकाशच देईनाशी झाली आहे आणि मूल्यांच्या स्थिरतेलाही अवकाश मिळेनासा झाला आहे.

या काळात एकीकडे साहित्यकार हा व्यापक अशा विश्वाकडे बघतो आहे आणि दुसरीकडे गुंतागुंतीच्या स्थानिक वास्तवाकडे बघतो आहे. या दोहोंनी त्याला असं गुंतवून ठेवलं आहे की दृष्टी थोडी आत वळवून गंभीर आणि भावनात्मक अशी आंतरविकासाची जी भूमी आहे तिच्याकडे त्याचं लक्ष जाणं अवघड झालं आहे.

दुसरीकडे विश्वाचा पसारा माणसाच्या दृष्टीपुढे जेवढा म्हणून खुला होतो आहे, तेवढी त्याची त्या संदर्भातली अशक्तपणाची आणि एकटेपणाची जाणीव आणखी गडद होते आहे.

आज आपण असं पाहतो आहोत की, एका बाजूला चंगळवादाच्या विळख्यात सर्व ललित कलांचा व्यापार अडकून त्यांना विक्रयमूल्य येत असताना आणि दुसऱ्या बाजूला संगणकयुगाचं अनाकलनीय वेगानं अवतरण होत असताना साहित्याची शक्तिमत्ता हळूहळू नाहिशी होत चालली आहे. तशी ती शक्ती गमावण्याची कारणं अनेक आहेत.

## साहित्यातलं सहितत्व नष्ट

प्रमुख कारण आहे ते साहित्यातलं सहितत्व गमावलं असल्याचं. जगण्याचा लढा सर्व पातळ्यांवर आणि सर्व क्षेत्रांत तीव्र, अधिक तीव्र होत चाललेला आहे. समाजातला कोणताच वर्ग त्यापासून सुटू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रश्न दारिद्र्याचे असोत, भ्रष्टाचाराचे असोत; त्यांचं स्वरूप आणि गुंतागुंत सर्वसामान्य माणसाला पेलवेनाशी झाली आहे.

दुर्दैवाची गोष्ट अशी की प्रत्येक माणूस सर्व पातळ्यांवर झुंडीमध्ये राहून सर्व लढे एकेकटा लढतो आहे. समूहांना एकत्र बांधणारं सूत्र आज कोणाच्याही हातात नाही आणि तसं सूत्र मिळवून देण्यासाठी, बळकट करण्यासाठी साहित्य आज समर्थ नाही.

जगातल्या सत्तासंघर्षाचे पवित्रे पाहताना, विज्ञानाची अचाट गती अनुभवताना आणि तंत्रज्ञान नवनवे विलक्षण चमत्कार घडवीत असताना माणसाला मात्र आपण आंतरिक गतिशीलता गमावत चाललो असल्याची आणि बाह्य गतिशीलतेचे भक्ष्य बनल्याची विदारक जाणीव होते आहे आणि अनेक अर्थांनी एकाकी असल्याचाही अस्वस्थ करणारा अनुभव येतो आहे.

ब्रह्माडांच्या शोधत दुसरी जीवसृष्टी अजून सापडलेली नाही; म्हणून पृथ्वीवरची जीवसृष्टी एकाकी आहे.पृथ्वीवरच्या निसर्गचक्रातली एक कडी म्हणून माणसाचं जगणं सांध्यातून निखळलं आहे आणि सृष्टीशी संवादी जीवनशैलीच नष्ट झाली आहे; म्हणून माणूस एकाकी आहे. आर्थिक-सामाजिक वर्ग, वर्ण, वंश यांच्या भेदांनी पोखरलेल्या मानवसमूहाचे अनेक खंड पडले आहेत आणि मधल्या दऱ्या रुंदावत आहेत. एकाकीपणा त्या दऱ्यांच्या पोटातूनही वर उठतो आहे आणि त्या सर्वांच्या जोडीला जगण्यातलं व्यक्तिभान प्रभावी असण्याच्या या काळात, समूह म्हणून जगण्याची, विचार करण्याची माणसाची शारीर-मानस-सांस्कृतिक तयारीही संपली आहे. माणसाच्या 'मी'पणाची धूपच होत नाही. उलट त्याचे थर अधिक कडक होत चालले आहेत.

## संस्कृती सहअस्तित्वाचं भान देणारी

वस्तुत: भारतीय संस्कृती एकाकीपणाचं भरण-पोषण करणारी नाही. एकरसीकरणाच्या इच्छेचा उच्चार करणारे लोकसमूह या भूमीवर प्राचीन काळापासून नांदत आहेत. वैदिक आणि अवैदिक अशा दोन्ही सांस्कृतिक धारांमधून ही सामूहिक जगण्याची आस नैसर्गिकपणे दिसते. केवळ माणसांचंच नव्हे, तर वनस्पती, प्राणी, नदी-पर्वतांसकट सर्व सृष्टीचं जगणं - सहअस्तित्व आदिमांसाठी मोलाचं होतं.

## मौखिक परंपरेतील शब्द

साहित्याचा मूलाधार असलेला शब्द इथे एकात्मतेची लक्षणं घेऊनच जन्माला आला. भाषेच्या जन्मकाळी आदिमांसाठी तो अत्यंत प्रभावशाली होता. ती नुसती वाणी नव्हती.ती एक प्रत्यक्ष कृतीही होती.घटनेचा उच्चार करणं, म्हणजेच ती घटना घडवणं. उच्चारित शब्दापोटी प्रचंड सामर्थ्याचा

साठा होता.

प्राचीन भारतीय साहित्याचा मोठा अंश, म्हणजे अशा उच्चारित शब्दाचं दर्शन. या प्रकारचं साहित्य ही भारतीयांची एक दीर्घजीवी, मुख्य आणि प्रभावी साहित्य परंपरा आहे. चाळीस लाख वर्षांची परंपरा. लिखित साहित्याची परंपरा फक्त चार हजार वर्षांची आहे.

प्राचीन माणसासाठी शब्द म्हणजे एक 'पंखयुक्त ध्वनी' होता आणि त्याचा उच्चार हा दुसऱ्या माणसासाठीच केलेला होता. बोलणारा आणि ऐकणारा किंवा ऐकणारे, यांची मिळून असलेली, ती एक सहभागित्वाची कृती होती. एकत्रिकरणाची भावना वाढीला लावणारी कृती होती. बोलणारा आणि ऐकणारे, यांचं मिळून एक लहानसं जगच तयार होत असे. दृढ अशा विश्वासावर आधारलेलं एक प्रभावी असं ते जग होतं.

या जगात प्रत्यक्ष संवाद फार महत्त्वाचा होता आणि शब्द हा उभयपक्षी त्या संवादाचा जिवंत वाहक होता. बोलणाऱ्याच्या श्वासावर स्वार झालेला शब्द त्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाशी घट्ट जोडलेला असायचा. त्याच्या एकूण देहबोलीचा एक घटक म्हणजे शब्द.

त्यामुळे या शब्दाचा इतर कलांशी फार सहज, स्वाभाविक आणि उस्फूर्त संवाद होता. शिवाय देहमुद्रांच्या आणि ध्वनीच्याही वापरामुळे संगीत, नाट्य आणि नृत्य यांच्याशी सहोदरभावाने शब्द सलगी करू शकत होता. अस्सल लावणी, उत्तम कीर्तन किंवा पोवाडे ऐकताना कालपरवापर्यंत माणसे याचा अनुभव घेऊ शकत होती.

उत्स्फूर्त आणि नेणिवेच्या जास्त जवळ असणारं मौखिक साहित्य ही एक सामूहिक कृती होती. लिखित शब्दाप्रमाणे ती अतिव्यक्तिगत गोष्ट नव्हती.

आजच्या सगळ्या सर्जनशील कलावंतांनी मात्र आपल्या आतल्या एकाकीपणाचा उच्चार केला आहे. हा एकटेपणा कलानिर्मितीच्या पातळीवर अटळपणे भेटणारा एकटेपणा जसा आहे, तसा तो साहित्याच्या लिखित परंपरेनेही जन्माला घातलेला आहे. उच्चारित शब्दाची परंपरा ही समूहातली, समूहजीवनाची पार्श्वभूमी लाभलेली परंपरा आहे. उलट लिखित शब्दाची पार्श्वभूमी म्हणजे फक्त एक कोरा कागद ! कोणा अज्ञात, अनोळखी वाचकांसाठी लेखक लिहीत असतो. मग ते वाचक कोणत्याही ठिकाणाचे, कोणत्याही संस्कृतीचे, देश-धर्म-वंशाचे असतील किंवा जन्मलेलेही

नसतील. लेखक लिहितो तेव्हा वाचक त्याच्यासमोर अमूर्त रूपात असतो.

मौखिक परंपरेत बोलणारा आणि ऐकणारा यांच्यामध्ये साक्षात जवळीक होती. एकमेकांमध्ये संवादाचं, विश्वासाचं एक सूत्रही होतं. म्हणून नाटकामधल्या स्वगतात आणि संवादात जो फरक आहे तोच फरक लिखित परंपरेतल्या आणि मौखिक परंपरेतल्या साहित्यात पडतो.

लिखित परंपरेतला वाचकही एकाकी असतो. त्याच्यासाठी लेखक समोर असत नाही. मौखिक परंपरेत बोलणाऱ्याचा शब्द ऐकण्यासाठी श्रोत्यांच्या ऐंद्रिय शक्ती एकवटल्या जातात. त्याची नजर वक्त्यावर खिळून असते.त्याचे कान शब्दांसाठी उत्सुक असतात. लिखित शब्द वाचताना पापणी उचलली की वेगळं जग डोळ्यांना भेटतं आणि अवधान ढळू शकतं.

## संतसाहित्य आणि मौखिक परंपरा

या संदर्भात ज्ञानेश्वरीतले श्रोतृसंवाद अतिशय बोलके आहेत. लिखित परंपरेच्या पाठीशी मौखिक परंपरेची सर्व शक्ती उभी करण्याची विलक्षण कामगिरी मराठी साहित्याच्या उदयकाळातच घडली होती. पुढे सबंध संतसाहित्याने मौखिक परंपरेच्या हातात हात ठेवण्याचं भान अखंड सांभाळलं आणि ते साहित्य लोकसमूहाचं अक्षय धन बनून राहिलं. संतसाहित्याची प्रेरकता, आवाहकता आणि चैतन्यमयता यांचा मूलस्त्रोत मौखिक परंपरेतच आहे. त्या परंपरेत असणाऱ्या समूहाच्या सामिलकीत–सहितत्वातच आहे. संतसाहित्यातली उत्स्फूर्तता, त्यातला मीपणाचा विलय, त्यातल्या हृदयसंवादाची जिवलग शैली आणि त्याचा प्रभाव, म्हणजे मौखिक परंपरेच्या गर्भातून, लिखित परंपरेला मिळालेली जन्मजात रक्तबीजं आहेत.

ज्ञानेश्वरी हा मराठीतला आदिग्रंथ ! त्याने अनेक प्रकारचे आदर्श आपल्यापुढे उभे केले आहेत. तो लिहिला गेला आहे खरा, पण तो सांगता सांगता लिहिला गेला आहे. एकान्ती बसून गीतेवरचं महाभाष्य लिहिणारे पंडित अशी ज्ञानेश्वरांची भूमिका असती तर ज्ञानेश्वरी आजच्या स्वरूपात निर्माण झालीच नसती.

सुसंवादित्व, एकरसीकरण आणि एकात्मता हे जे ज्ञानाचं प्रयोजन, ते त्यांनी सहजच अभंग राखलं आहे. श्रोत्यांसमोर वक्ता साक्षात आहे आणि तोही आपल्या ग्रंथात जो जो प्रसंग वर्णन करतो आहे, त्या त्या

प्रसंगाचा काळ निवेदनस्थळी प्रत्यक्ष खेचून आणतो आहे. जुनं, भूतकालीन असं जणू काही नाहीच.

लिखित परंपरेत लेखकाची निवेदनातील अनुपस्थिती कटाक्षानं सांभाळण्याचं जेवढं महत्त्व असतं, तेवढ्याच कटाक्षानं, मौखिक परंपरेतल्या साहित्यकारानं, आपली उपस्थिती सांभाळलेली असते. एखादा लोककलावंत एखादी कहाणी सांगताना, एखादं आख्यान रंगवताना किंवा एखादं लोकगीत गाताना ऐकलात तर तुमच्या लक्षात येईल, की उच्चारित साहित्याला एका बाजूनं काळाशी आणि दुसऱ्या बाजूनं स्थळाशी जोडलं जाण्याची एक स्वाभाविक शक्ती असते. म्हणून तो बोलीचा जिवंत डौल कायम राखत आणि प्रादेशिकतेचं रसरशीत चैतन्य खेळवत, काळाचं संवेदन अस्सलपणे व्यक्त करत जातं. मौखिक परंपरेचं हेच वैशिष्ट्य सांभाळणारं साहित्य हे मराठीतलं कसदार साहित्य ठरल्याचं, आज आपण पहातो आहोत.

## लोकपरंपरेची समृद्धी

व्यक्तीचं सामाजिकीकरण, शिक्षण आणि संवाद प्रेषण यांच्या फार मोठ्या शक्यता धारण करणारी मौखिक परंपरा म्हणजे लिखित साहित्यपरंपरेचं मायपोट आहे. अनेक पाश्चात्त्य विद्वानांनी लिखित परंपरेला 'ग्रेट ट्रॅडिशन' आणि मौखिक परंपरेला 'लिट्ल ट्रॅडिशन' म्हणून संबोधलं आहे. पण वस्तुस्थिती नेमकी उलट आहे.

वास्तविक लोकपरंपरा हीच लिखित परंपरेपेक्षा सहस्त्रपटींनी प्राचीन, इथल्या जनजीवनात प्रतिष्ठित आणि इथल्या सर्वसामान्यांचं प्रतिनिधित्व करणारी अधिक व्यापक, अधिक सकस अशी परंपरा आहे. ती अडाणीमाणसांनी सांभाळली हा आणखी एक गैरसमज आहे. ती अनक्षर लोकांनी सांभाळली हे वास्तव आहे.

अनक्षरत्व हे लिखित परंपरेचा गौरव करणाऱ्या समाजात अज्ञानाशी जोडलं गेलं आणि मौखिक परंपरेकडे उपहासाने आणि तुच्छतेने पाहण्याची वृत्तीही बळावत गेली. मात्र ए. के. रामानुजनसारखा जाणकार, व्यासंगी अभ्यासक जेव्हा मौखिक साहित्याचा अभ्यास करू लागतो तेव्हा राष्ट्रीय पातळीवरची या साहित्याची मौलिकता त्याच्या ध्यानी येते आणि एकात्मतेचे धागे बळकट होण्याच्या केवढ्या शक्यता त्यात सामावलेल्या आहेत,

याचीही सार्थ जाणीव होते.

सीताकांत महापात्रांसारखा संस्कृतीचा मर्मज्ञ भाष्यकार मौखिक परंपरेचं, ग्रीकांना जाणवलेलं महत्त्व, कोणत्या कारणांनी होतं हे समजू शकतो आणि स्मरणशक्तीचं महत्त्व कमी करणाऱ्या, लिखित परंपरेबद्दलचा, ग्रीकांचा आकस कसा सार्थ होता याचं विश्लेषण करतो. लिखित शब्द जगण्याची शक्यता जास्त असते आणि भूतकाळ धरून ठेवण्याची त्यांची शक्तीही जास्त असते, हे मान्य करून सुद्धा, मौखिक परंपरेचं श्रेष्ठत्व त्याला अनेक पातळ्यांवर अनेक अंगांनी आणि जीवनाच्या व्यापक संदर्भात स्पष्ट करावसं वाटतं.

आपल्याकडे मौखिक परंपरेचा अभ्यास मर्मदृष्टीनं करणारे भालचंद्र नेमाडे जेव्हा निर्मात्याचं निर्मितीशी असलेलं नातं तपासत या देशी परंपरांकडे पाहतात, तेव्हा नाममुद्रेचा फारसा आग्रह न धरणारी आणि व्यक्तीनिर्मित कृती, ही समूहाची होऊन जाण्यातच सार्थकता मानणारी, मौखिक परंपरा त्यांना लिखित परंपरेतल्या 'कॉपीराईट'चा हक्क बजावणाऱ्या अहंभावी लेखकांच्या पार्श्वभूमीवर अधिक मोठी वाटते.

भारतासारख्या खंडप्राय देशात खरं तर आजही दीड हजारांपेक्षा अधिक बोली अस्तित्वात आहेत आणि त्यांपैकी लिखित परंपरेशी संबंधित अशा फक्त पंचवीस–तीसच आहेत.

लिखित शब्दानं संस्कृतीतल्या ज्ञानाच्या संकल्पना आणि ज्ञानाच्या समावेशाच्या पद्धतीच बदलल्या. नव्या पद्धती, मानवी देहमनाच्या अनेक प्रेरणा आणि शक्तींना गौण ठरवणाऱ्या होत्या, निरुपयोगी ठरवणाऱ्या होत्या. आपल्या दैनंदिन जीवनाचा विचार केला, तरी याची उदाहरणं सहज सापडतील. मुळाक्षरांची पाठांतरं संपली. पाढे संपले. तोंडी गणितं गेली. कथा–गीतं हरवली.पाठ होतील अशा कविता संपल्या. माणसांना गोष्टी सांगता येईनाशा झाल्या.

## समूहजीवन धोक्यात

असं वाटतं की मानवी सहनशक्तीची गरजही हळूहळू संपुष्टात येत चालली. माणसाचे ऐंद्रिय संवेदनांद्वारे ज्ञान संपादन करण्याचे मार्ग बिनमहत्त्वाचे ठरले. उच्चार आणि उच्चार–स्वातंत्र्याची निकड गौण होत चालली आणि समूहानं जगण्याची ताकदही क्षीण झाली. अभिव्यक्ती

स्वातंत्र्याचा मुद्दा ऐरणीवर येण्यामागे हा एक अदृश्य असा इतिहास आहे.

आज आपलं समूहजीवन म्हणजे एक दु:स्वप्न बनलं आहे. स्वस्थ, प्रगतिशील समूहाऐवजी आज दिशाहीन, अविचारी झुंडी फक्त दिसत आहेत. तशा झुंडींच्या पाशवी रूपाचं भय वाटून सामान्य माणसं अधिक भयभीत होत जात आहेत. समूहात सुखानं आणि सहभावानं जगणं शक्य होत नाही म्हणून सामूहिक जगण्याचाच संकोच ती करत चालली आहेत. अतिवैयक्तिकतेमुळे समूहजीवन धोक्यात आलं आहे आणि समूहाचे प्रश्न सोडविण्यासाठीही एकत्र येण्याची तयारी नसणारी माणसं अधिकाधिक संभ्रमित, भयावह आणि रिकामं जीवन जगत आहेत.

## देशी साहित्यपरंपरेची मुळे उखडली

अव्वल इंग्रजी कालखंडाने इथल्या सर्वसामान्य माणसाच्या विचारप्रक्रियेचा ताबाच इंग्रजांकडे दिला. त्यामुळे स्वत:ची परंपरागत विचारसाखळी नव्या ज्ञान-विज्ञानाच्या मदतीने आणि बदलत्या जगाच्या अनुभवाने मजबूत करणं, इथल्या शिक्षितांना शक्य झालं नाही. मराठी साहित्याच्या क्षेत्रात देशी साहित्यपरंपरेची मुळंच उखडली गेली. अनेक सुधारक लोकनेत्यांनी, विचारप्रक्रियेचं सातत्य आणि स्वातंत्र्य अबाधित राखण्याचा प्रयत्न केला. पण पाश्चात्त्य विद्या-कलांचं आकर्षण आणि श्रेष्ठत्व यांची एवढी जबरदस्त पकड समाजमनावर होती, की तशा प्रयत्नांचा आणि धडपडीचा टिकावही लागला नाही.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे त्याचं साक्षात उदाहरण. एकदेशीय विचारांच्या मर्यादा टाळून रानड्यांनी सामाजिक उत्थानाचे अतिशय भरीव आणि व्यापक प्रयत्न चालवले होते. मुख्यत: भारतीय विचारप्रणालीशी असलेली समूहाची नाळ तोडण्याचे राजसत्तेचे हेतुपूर्वक प्रयत्न आणि ती तोडण्याची नवशिक्षित वर्गाची उताविळी यांचं पूर्ण भान ठेवून रानड्यांनी आपला सुधारणावादी विचार देशीय पद्धतीने नेटाने पुढे नेण्याचा यत्न केला.

परिवर्तनाचे कालोचित प्रयत्न खुले आणि मूलगामी करून बहुजनांशी तो विचार दृढ जोडून ठेवणारे महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आठवण तर इथे होतेच आणि विशेषत: महात्मा फुल्यांचे अखंड हे मराठीतलं अत्यंत कसदार असं काव्यरूप असल्याचंही लक्षात येतं.

श्रीपाद महादेव माटे आणि दत्तो वामन पोतदार या दोघांची इथे आणखी आठवण होते. या दोघांचं लेखन म्हणजे देशी गद्याचे उत्तम नमुने आहेत. त्या गद्याचा कस, जोरकसपणा, जिवंतपणा यांचं मूळ, इंग्रजपूर्व भारतीय साहित्यपरंपरेतलं आहे. भाषेचा अस्सल देशी वाण या दोघांनी दाखवला, तो काही चमत्कार नव्हता.

**भारतीय समाजाची बांधणी**

गांधीजींच्या निकट सहवासात असलेले ज्येष्ठ समाजचिंतक धर्मपाल यांनी भारतीय समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण जडणघडणीविषयी एके ठिकाणी लिहिलं आहे -

'स्थानिक क्षेत्र आणि त्या क्षेत्रांत (तसेच, अशा अनेक क्षेत्रांच्या मिळून बनलेल्या प्रदेशांत) प्राचीन काळापासून, निदान शेकडो वर्षांपासून वास करीत आलेल्या गोतावळ्यांना मिळून बनलेला समुदाय, हे भारतीय समाजाच्या बांधणीचे दोन पायाभूत घटक (बिल्डिंग ब्लॉक्स) राहिलेले आहेत. वैविध्याला अवकाश, स्वायत्तता आणि सर्व समुदायांचा सहभाग, ही इथल्या राजकीय संघटनेची वैशिष्ट्यं राहिली.'

'देशी राजकीय बांधणीची किंवा आर्थिक बांधणीची ही सूत्रं ध्यानात न घेता ब्रिटिशांनी त्यांचं साम्राज्य इथे प्रस्थापित केलं आणि ती सूत्रं धिक्कारत यांना निकालात काढण्याची भूमिका इथल्या साहेबी विचारांच्या नवशिक्षित वर्गानं घेतली. लोकसमूहांचा बृहद् गोतावळा म्हणून जगणाऱ्या इथल्या समाजाचं पोषण करणाऱ्या इतिहास-संस्कृतीचा इथल्या जनसमूहांच्या सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा आणि स्वभाव-प्रकृतीचाच त्याग करून नव्याकडे धाव घेण्याचा तो आंधळा उत्साह होता.'- धर्मपालांचं हे निरीक्षण अगदी अचूक आहे.

परिणामी देशी कला, साहित्य आणि संस्कृतीकडे आपलं केवळ दुर्लक्षच झालं असं नाही, तर त्यांच्याकडे तुच्छतेने पाहण्याची प्रवृत्ती बळावली. त्यामुळे परंपरागत विचारसाखळी छिन्न झाली. शहरं आणि खेडी यांच्यामधले भावनिक आणि जैविक बंध तुटले. आज आपण तीनही पिढ्यांमधल्या आणि समाजाच्या सर्व थरांमधल्या कसदार लेखकांचं साहित्य वाचतो तेव्हा हे तुटलेपण किती भयकारी आहे याची जाणीव सर्वदूर अधोरेखित होत जाते. या दृष्टीने हे साहित्य म्हणजे मराठीच्या

सांस्कृतिक इतिहासातला एक महत्त्वाचा टप्पा आहे.

या साहित्यातून दिसणारी सर्वसामान्य माणसाची ससेहोलपट अत्यंत अस्वस्थ करणारी आहे आणि तिच्या कारणांचा विचार त्याहूनही क्लेशकारक आहे. महानगरातून उदयाला आलेला एक प्रतिष्ठित असा वर्ग एका बाजूला नव्या मूल्यव्यवस्थेचा स्वीकार करणारा आहे. सार्वजनिक जीवनात जातिभेद, धर्मभेद यांना दूर ठेवू पाहणारा, व्यक्तिगत गुणवत्तेचं महत्त्व मोठे मानणारा आणि ग्रामीण लोकजीवन मागास मानून तुलनेत स्वत:ला प्रागतिक आणि आधुनिक मानणारा आहे.

**कलासाधना ही नागर माणसांची मक्तेदारी**

मात्र या वर्गाने, केवळ साहित्याचेच नव्हे, तर सर्व प्रकारच्या कलांचे आणि कलाविषयक उपक्रम ही आपलीच मक्तेदारी ठरवली. कलासाधना आणि कलाव्यापार हे त्यांचे विशेषाधिकार ठरले. गिरीश कार्नाडांच्याच शब्दांत सांगायचं झालं तर भारतीय समाजात एक नवी परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रतिष्ठित समाज ज्या व्यवसायांना चार हात दूर ठेवत आला, तेच व्यवसाय स्वरूप बदलून त्यांच्या ‘कलासाधनेचे श्रेयस्कर व्यवसाय’ म्हणून स्वीकारले गेले आहेत. केवळ कलांचे आश्रयदातेच नव्हेत, तर प्रत्यक्ष कलाव्यवहारही खेड्यांमधून आणि लहान लहान गावांमधून, शहरात दाखल होत गेला आहे. कलाविषयक उपक्रम हे शहरी जीवनाचा भाग आणि तिथल्या उच्चवर्णीयांचा विशेषाधिकार बनले आहेत. मात्र या प्रक्रियेत खेळ करणाऱ्या कला पिढ्यानपिढ्या जतन करणारे समाजघटक बाजूला ढकललं जाणं ओघानंच आलं आहे.

गिरीश कार्नाडांनी फार मार्मिकपणे या परिवर्तनाचा परिणाम हेरला आहे. कारण उच्चवर्णीयांना संस्कृतीचा आरसा म्हणून ज्या कला त्यांना सोयीस्कर वाटल्या, त्या त्यांनी त्या कलांच्या वारसदारांकडून तोडून घेतल्या आणि त्यांची नव्याने जोपासना चालवली.

याचा परिणाम म्हणून मूळच्या कलांना जीवनरसाची रसद होणं बंद झालं आणि उपजीविकेचं साधन म्हणून त्या कला सांभाळणारे कलावंत निराश्रित, निर्धन झाले. गावोगावी कथा करीत हिंडणारे लोककलावंत संकटात आले आणि कथा ही मुख्यत: शहरी, मध्यवर्गीय संवेदनाचीच कथा उरली. लोकगीतांची अत्यंत सकस आणि रसरशीत परंपरा उपेक्षित

ठरली आणि 'वैणिक' किंवा 'लिरिक'शी जवळीक साधणारी भावकविता, एवढाच काव्यक्षेत्राला प्रतिष्ठित आणि प्रमुख प्रवाह झाला.

एवढंच नव्हे, तर पारंपारिक संस्कृतिसंबद्ध अशी विचारसाखळी खंडीत झाली. दुसरीकडे मुख्य प्रवाहातल्या साहित्याचाही तोंडावळा बदलत गेला. वाङ्‌मयीन परंपरांमधील वैचारिक वाङ्‌मयाची धारा क्षीण होत गेली. इथे सार्वजनिकरीत्या वादविवादाची, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करीत खंडन-मंडनाची पद्धत अस्तित्वात होती, ती नष्ट झाली. समग्रतेचं, प्रश्नाच्या संपूर्ण आकलनाला महत्त्व देण्याचं निरोगी भान नाहीसं झालं. तिची जागा आता माध्यमांमधून संदर्भरहित, तात्कालिक आणि अपुरा विचार करणाऱ्या आणि संवादाकडे जाण्यापेक्षा वादांनी व्यासपीठ रंगवणाऱ्या लोकचर्चेने घेतली.

## मूल्यव्यवस्थेत बदल

साहित्यातली मूल्यव्यवस्थाही बदलली. मौखिक वाङ्‌मय हे जे जीवनाशी निगडित होतं, उपजीविकेशीही निगडित होतं ते टाकाऊ ठरलं आणि साहित्य हा नव्या मूल्यमापनानुसार व्यक्तिगत सृजनशीलतेचा आविष्कार ठरला. समूहमनाचं प्रकटीकरण करणं हे साहित्याचं कार्य नाही, साहित्य हे व्यक्तिमनाचा आरसा असायला हवं असा विचार प्रभावी झाला आणि साहित्याच्या केंद्रस्थानी 'मी'ची प्रतिष्ठापना झाली.

या 'मी'ने साहित्याला हजार मुखांनी बोलणाऱ्या साहित्यापासून आग्रहपूर्वक दूर नेलं आणि लेखकाचा आत्मस्वर व्यक्त होणं हेच साहित्याच्या सर्जनशील स्वरूपाचं व्यवच्छेदक लक्षण मानलं. केशवसुतांच्या व्यक्तिनिष्ठ कवितेचा, कवी ग्रेस यांच्या आत्यंतिक दुर्बोध कवितेपर्यंत झालेला प्रवास, या संदर्भात उत्तम तपासता येतो आणि बहिणाबाईंची कविता हा या संदर्भाला मिळालेला छेद अपवाद म्हणूनच का राहतो. तो मध्यवर्ती प्रवाह का बनत नाही, याचाही उलगडा होतो.

साहित्याचं थोरलेपण हे त्याच्या अंगी असलेल्या सहितत्वामुळे, जीवनसंबद्धतेमुळे आणि समूहस्वर उमटवण्याच्या असंख्य शक्यतांमुळे असतं हे आपण विसरता कामा नये आणि व्यक्तीच्या अनुभवांच्या संकुचित परिघातच साहित्यनिर्मिती अडकूनही पडता कामा नये.

मराठीच्या प्रारंभकाळात, खरं पाहता मौखिक आणि लिखित अशा

दोन्ही परंपरा इथे नांदत होत्या आणि एकमेकींना पूरक होत होत्या. संतसाहित्य आणि लोकसाहित्य यांचा अपूर्व बंध जुळला होता आणि शब्दाला दीर्घजीवी, सकस अशी लोकमान्यता आणि लोकप्रियता मिळाली होती. परंपरा आणि नवता यांचा सेंद्रीय मेळ तिथे झाला होता. अरुण कोलटकर, दि. पु. चित्रे यांनी या मेळाचं महत्त्व पुन:पुन्हा का अधोरेखित केलं याची मीमांसा नव्या साहित्यकारांनी समजून घेतली पाहिजे.

## स्त्रीजीवन आणि लेखन

सांस्कृतिक समृद्धीचं लक्षण म्हणून सतत आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आणि त्यातून निर्माण झालेल्या सोयी-सुविधांचा उल्लेख करतो पण खरं पहाता माणसाचं सजग, संवेदनापूर्ण असं आंतरजीवन आणि तिथली सृजनशीलतेची गजबज हेच सांस्कृतिक समृद्धीचं मुख्य लक्षण आहे. त्यामुळे हे जणू ओळखल्यासारखा आज स्त्रियांच्या लेखनाचा सारा मोहरा भौतिक जग, विज्ञान-तंत्रज्ञान, राजकारण आणि अर्थकारण यांच्या पलीकडच्या अधिक गंभीर अशा मानवी संबंधांकडे आणि आपल्याच आतल्या जगाकडे वळवलेला दिसतो.

काळाच्या एका विराट पटावर स्त्रियांचं लेखन किंवा स्त्रियांची एकूणच अभिव्यक्ती पहा. केवळ मराठी नव्हे, केवळ भारतीय नव्हे, एकूणच जगभरातल्या स्त्रियांची अभिव्यक्ती पहा. त्या प्रचंड काळाच्या विस्तारात काय दिसतं?काय म्हणता येतं?

सुरुवातीचा काळाचा तुकडा असा होता की, आदिकाळापासून पुरुषाला सोयीचं असणारं आणि बाईनं नकळत स्वीकारून टाकलेलं तिचं, म्हणजे स्त्रीचं दुय्यम स्थान- कुटुंबातलं, समाजातलं-एकूणच जगण्यातलं-तिला इतकं त्या स्थानालाच बांधून ठेवणारं झालं होतं की त्या एका दुय्यम स्थानालाच पुरुषसत्तेनं कधी देवी म्हटलं आणि कधी दासी - हे सुद्धा तिच्या लक्षात आलं नाही.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांचा काळ हा स्त्रीलिखित साहित्याच्या बाबतीत विशेष गजबजीचा काळ आहे. किंबहुना बहुमुखी, विस्तारशील असं लेखन, आत्मशोधाचं आणि स्त्रीत्वाच्या शोधाचं माध्यम म्हणून साहित्याशी दृढ झालेलं नातं, प्रगल्भ जीवन जाणिवांचा समंजस आविष्कार आणि ढोबळ विद्रोहाच्या पलीकडे जाऊन केलेला परंपरेचा आणि पुरुषसत्तेचा

पुनर्विचार ही आजच्या स्त्रीलिखित साहित्याची लखलखीत वैशिष्ट्यं आहेत.

सांस्कृतिक समृद्धीचं लक्षण म्हणून आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीकडे आणि त्यामुळे निर्माण झालेल्या भौतिक सोयी-सुविधांकडे पाहतो, पण माणसाचं सजग, संवेदनपूर्ण आणि निर्मितीशील असं जीवन आणि त्याच्या सहृदयतेतून निर्माण होणारी विविध प्रकारची अभिव्यक्ती हा खरा सांस्कृतिक संपन्नतेचा गाभा आहे. हे जणू ओळखल्यासारखा स्त्रियांच्या लेखनाचा मोहरा अर्थकारण-राजकारणापलीकडच्या गंभीर अशा मानवी संबंधांकडे आणि स्वत:च्या शोधाकडे ही अधिक वळलेला दिसतो.

## काळाची पार्श्वभूमी

काळाच्या विस्तृत पटावर जगभरातली स्त्रियांची अभिव्यक्ती पहा. त्यामागची काळाची पार्श्वभूमीही पहा. शिकारी अवस्थेतून बाहेर पडताना अग्नीचा शोध लागल्यानंतर आग सातत्यानं पेटती ठेवण्यासाठी तिच्याजवळ थांबलेल्या गर्भार किंवा नवप्रसूत बायकांनी मुलाबाळांची आणि शिकारीच्या धकाधकीत निरुपयोगी असलेल्या अपंग, आजारी, वृद्ध स्त्री-पुरुषांची काळजी घेतली आणि त्यातून तिच्या वाट्याला संगोपन, स्वयंपाक आणि शुश्रूषा ही कामं कायमची आली. सुरुवातीची साधी श्रम विभागणी हळूहळू समाजव्यवस्थेचा एक अपरिवर्तनीय भाग बनली.

वास्तविक शेतीची सुरुवातही बाईनं केली. हातातल्या काठीनं जमीन उलगून तिनं शेती सुरू केली आणि पुढे हळूहळू पुरुषानं नांगरासह विविध साधनांनी तिचं कर्षण सुरू केल्यावर नव्यानं जी कृषिसंस्कृती उद्याला आली, तिथे बाई ही सर्वस्वी दुय्यम स्थानावर गेली.

आपल्याकडे बहुतेक वैदिकेतर समाजांमध्ये तिचं अनेक बाबतीतलं स्वातंत्र्य कायम राहिल्याचं समाजेतिहासातलं तथ्य आहेच. पण संस्कृतीच्या मुख्य धारेत, वेदांच्या उदयकाळात ज्ञानार्जनाबरोबरच सार्वजनिक जीवनातल्या बहुतांश गोष्टींचं स्वातंत्र्य अनुभवणारी स्त्री मात्र हळूहळू देवीकडून देवदासीकडे प्रवास करत गेली. समाजरचनेत अत्यंत गौण स्थानावर जात राहिली. मध्ययुगीन भारतात तर माणूस म्हणून तिचं अस्तित्वही धोक्यात आलं.

या गौण स्थानापासून सुटका आणि स्वत:ची स्वत:ला झालेली ओळख यामध्ये संस्कृतीचाच नाही तर सगळ्या कलांचाही इतिहास

वेगवेगळ्या प्रकारे, वेगवेगळ्या पातळ्यांवर गुंतलेला आहे.

**आत्मभानाचा प्रवास**

आधुनिक काळाचं एक सर्वांत मोठं लक्षण म्हणजे आधी समंजस पुरुषांच्या मदतीनं आणि नंतर स्वत:ची स्वत:च बाई हा इतिहास वाचायला शिकली, स्वत:ला वाचायला शिकली आणि मग एका जुन्या कवीनं- कवी बींनी म्हटल्याप्रमाणे -

**दुर्बळपण पहिले गेले । क्षुद्रपणातुन मी सुटले ।**
**जीर्ण बंध सगळे तुटले । मी माझी मज सापडले** (पिंगा)

अशी वेळ आली.

हे सगळं घडणं, थोड्या मागे-पुढे जाग्या होऊन, अगदी बारीक तपशिलांनी शब्दांत मांडणाऱ्या बायका गेल्या शंभर वर्षांत तुम्हाला जगभरात दिसतील. खरं तर केवढी मोठी घटना आहे ही ! आणि वाङ्मयेतिहास लिहिणाऱ्यांना किंवा सांस्कृतिक इतिहासज्ञांना त्याची दखलही घ्यावीशी वाटली नाही, गेल्या २५-३० वर्षांपर्यंत ?

अख्ख्या मानवजातीचा विचार करता तिच्यामधली अर्धी प्रजात, शंभर वर्षांच्या लहानशा कालखंडात-म्हणजे मानवजातीचा लाखो वर्षांचा इतिहास आणि स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा हजारो वर्षांचा काळ बघता - एका अगदी लहानशा कालखंडात जी आधी, मोजके अपवाद वगळता, सामाजिक संदर्भात स्वत:बद्दल विस्मृत आणि केवळ स्वीकारशील अशीच जगत होती, ती जागी होते आणि तिला स्वत:ची स्वत:ला माणूस म्हणून ओळख मिळते ही केवढी मोठी गोष्ट आहे ! आत्मसाक्षात्कार असा मोठा शब्द त्याला अध्यात्माच्या परिभाषेत आहे.

जगण्याच्या संदर्भातला- सांस्कृतिक संदर्भातला स्त्रीला झालेला आत्मसाक्षात्कारच म्हणायचा की हा ! मी आहे, स्त्री जातीचा जीव आहे मी, मी माणूस आहे. हे तिला कळलं आणि मग त्या जीवाची सर्व बाजूंनी ओळख ती सांगत राहिली. त्या जीवाची स्पंदनं ऐकत-ऐकवत राहिली. तोपर्यंत ती स्पंदनं दाबून ठेवणाऱ्या, दडपणाऱ्या सगळ्या सामाजिक- सांस्कृतिक व्यवहाराविषयी भल्या-बुऱ्या प्रतिक्रिया देत राहिली.

हे आधी, उरलेल्या अर्ध्या प्रजातीला-पुरुषजातीला धक्कादायक वाटलं, धोकादायकही वाटलं. शिवाय कोणतीही स्थिर गोष्ट किंवा स्थिर वाटणारी,

स्थिर मानलेली गोष्ट हलायला लागली की भीती वाटते, नको वाटतं, असुरक्षित वाटतं. तशा प्रतिक्रियाच मोठ्या प्रमाणात उमटल्या. विरोध, उपहास, चेष्टा, राग, संताप, नकार, कोंडी करणं, पेच घालणं, अडथळे निर्माण करणं – पण कालांतरानं हेही मावळलं. पहिल्या प्रतिक्रियांमधला समजुतीचा भाग अधिक जोरकसपणे पुढे आला, विस्तारला, थोडा थोडा स्वीकार करता यायला लागला. स्त्रीचे आधीचे प्रश्न यातून बरेचसे मिटले. तशा नव्या गुंतागुंती – नवे प्रश्नही निर्माण झाले. आधीचे प्रश्न ज्या पर्यावरणाशी जोडलेले होते ते पर्यावरण बदललं आणि समाजाची मानसिकता त्यानुसार थोडीफार बदलली. म्हणून मग सतीची प्रथा गेली, पातिव्रत्याचे रूढ संकेत मोडले, बालविवाह गेले, जरठ–कुमारी विवाह आणि केशवपन गेलं. संमतीवय, घटस्फोट अगदी लिव्ह इन रिलेशनपर्यंत आपण येऊन ठेपलो. वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या संधी तिच्यासाठी निर्माण केल्या गेल्या, कायदे आले, अधिकार मिळाले, पुष्कळसं स्वातंत्र्य मिळालं.

**स्वातंत्र्यानंतरचे नवे प्रश्न**

पण या स्वातंत्र्यानंच नवे प्रश्न निर्माण झाले. उदा. स्त्रियांचं आर्थिक स्वातंत्र्य. २००१ च्या जनगणनेनुसार भारतात अर्थार्जन करणाऱ्या बायका फक्त २५% आणि त्यातही कष्टकरी वर्गातल्या, मजूर वर्गातल्या स्त्रिया ७०% आहेत. म्हणजे आर्थिकदृष्ट्या कमावत्या बायका एकूणात फक्त २५% आणि त्यांनाही आर्थिक स्वातंत्र्य जवळजवळ नाही. (मी आयटीतल्या कमावत्या आणि १% बायकांची गोष्ट करत नाहीये. मी त्या बायकांची गोष्ट करते ज्यांच्यात शैला लोहिया, विजया चौक यांनी काम केलं. किंवा आज राणी बंग, चेतना सिन्हा, चंद्रिका चौहान किंवा विद्याताई बाळ काम करताहेत, करू बघताहेत.)

एकाग्रता आणि धारणाशक्ती बाईकडे जास्त आहे; याचा विकासासाठी किंवा समाजपोषक गोष्टींसाठी उपयोग करून घेणं मात्र समाजाला जमलेलं नाही. विसावं शतक हे जेवढं प्रचंड विज्ञान–तंत्रज्ञान विकासाचं शतक आहे तेवढंच ते शोषक, आक्रमक, मानवताविरोधी वाटचाल वेगानं करणारं शतक आहे.

स्त्रियांच्या विस्मित करणाऱ्या कर्तबगारीच्या नोंदींइतक्या, किंबहुना त्यांपेक्षा कितीतरी अधिक पटींनी स्त्रियांवरच्या अत्याचारांची आकडेवारी

वाढती आहे.

आज सार्वत्रिक सपाटीकरणाची लाट आली आहे. आणि अनेक भाषा मरू घातल्या आहेत. पण भाषा आणि स्त्रिया यांचा पूर्वापारचा फार निकट संबंध होता. जसा पर्यावरण आणि स्त्रियांचा होता तसा. स्त्री आणि पर्यावरण - एकूणच पर्यावरण. आपण हे दोन्ही संबंध कधी लक्षात घेतले नाहीत आणि या तीनही परस्परसंबंधित घटकांवर अत्याचारच करत आलो आहोत. खरंतर बायकांची बोलण्याची क्षमता पुरुषांपेक्षा कितीतरी पट जास्त आहे. पुरुष दिवसाला साडेचारहजार शब्द सरासरी बोलतो आणि बाई वीस हजार शब्द - असं संशोधन सांगतं. शिवाय जगण्याला धरून भाषा टिकवण्याचं जास्त श्रेय बाईचं. तिची भाषेतील अभिव्यक्ती क्षमता पुरुषापेक्षा जास्त आहे पण तिचं लिहिणं कुठं आहे ? अशा आज पुष्कळ म्हणजे पुष्कळच जणी आहेत, ज्यांचं जगणं लिहिलं गेलेलंच नाहीये.

थोड्याशा शहरी, मध्यमवर्गीय, उच्चवर्णीय बायका कदाचित आज स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सुख शोधत आपापल्या वाटेवरचे प्रश्न - मग ते नातेसंबंधातले असोत की समाजव्यवस्थेतले असोत, त्यांच्या मुळाशी जात, जगणं समजून घेत लिहित राहिल्या आहेत आणि आणखीही पुष्कळ साठ-सत्तर-ऐंशी टक्के बायका ज्या (रझिया पटेलच्या शब्दांत सांगायचं तर) 'हिसाब, हुनर और हिंमत चाहिये' असं म्हणत त्याच दिशेनं जाण्यासाठी - तेच स्वातंत्र्य, न्याय, सुरक्षितता, सुख-मिळवण्यासाठी धडपडतायत, तहानलेल्या आहेत, त्यांचं जगणं, आणि ज्यांना अजून ही दिशाच दिसलेली नाही, हे शब्दच माहीत झालेले नाहीत - मग अर्थ तर कोसो दूर आणि कृतीची शक्यता बहुधा नाहीच, अशाही पुष्कळ जणी आहेत, त्यांचं जगणं कुठे साहित्यात आलेय?

'स्त्रियांना आता सगळ्या प्रकारचं स्वातंत्र्य मिळालंय. म्हणून तर त्या वाट्टेल तशा वागतायत आणि वाटेल तसं लिहितायतही. आणखी काय हवंय त्यांना ?' असं म्हणणाऱ्यांनी या वास्तवाकडे एकदा गंभीरपणे पाहिलं पाहिजे. आजच्या चंगळवादानं घेरलेल्या वर्तमानात केवळ स्त्रियाच नव्हेत तर सर्वच स्त्री-पुरुषांचा मिळूनचा समाज, सर्जनकेंद्री नव्हे तर संपत्तीकेंद्री आणि संहारकेंद्री जगाची नव्यानं रचना करू बघतो आहे. त्या आवेशाच्या भरात ज्या ज्या जुन्यावर त्यानं प्रहार केले आहेत त्यात समाजपोषक अशा कित्येक मूल्यांचा घात झाला आहे आणि त्यांची जागा भ्रष्टतेनं, सवंगतेनं

घेतली आहे. त्या भ्रष्टतेचा, त्या सवंगतेचा, त्या निर्मम बाजारुपणाचा मोह पडलेली आणि दंभ चढलेली माणसं – त्यात स्त्रिया आहेत तसे पुरुषही आहेत – अशी माणसं विचारपूर्वक आणि संवेदनात्म जगणंच विसरून चालली आहेत. ही अस्थिरता आणि विचारशून्यता नुसतीच अस्वस्थकारक नाही तर भयावहही आहे.

## जीवनपरिवर्तनाची शक्ती

पण बाईजवळ जी जीवनपरिवर्तनाची ताकद आहे ती विलक्षण आहे. तिच्याच बळावर आयुष्यातले अग्रक्रम ती बदलू शकते. मग तुकारामांसह सदेह वैकुंठाला जाण्यापेक्षाही पोराबाळांना जेऊ घालणं, सांभाळणं–वाढवणं किंवा गाभण म्हशीची काळजी घेणं जास्त मोलाचं ठरू शकतं. कुटुंबासाठी, मुला–नवऱ्यासाठी, करिअरच्या मोठ्या संधी नाकरणाऱ्या बायकांना अशा निर्णयामधली स्वाभाविकता चांगली समजू शकते. याचा अर्थ असा नव्हे की बाईनं असेच निर्णय घेणं, असेच अग्रक्रम ठेवणं गरजेचं आहे; पण बाईच्या बाबतीत आपण अनेकदा तसंच गृहीत धरण्याची चूक करू शकतो, एवढंच लक्षात घेणं आवश्यक आहे.

इतिहासाच्या मुठीत अशी अनेक उदाहरणं आहेत की जेव्हा माणुसकीला झाकोळून टाकणारा आणि स्त्रीला भयमुक्त जगू न देणारा पुरुषाचा अहंकार संधी मिळताच बाईने कधी चातुर्याने तर कधी संघर्षाने दूर केला आहे. कारण बाईला पुरुष तिचा शत्रू वाटत नाही. स्पर्धकही वाटत नाही. आयुष्यात वेगवेगळ्या नात्यांनी पुरुष तिला हवा आहे पण त्याच्याबरोबर जगताना त्यानं स्वत:च्या आणि तिच्याही माणूसपणाचं मोल जाणावं आणि ते अबाधित ठेवावं अशी तिची प्राथमिक अपेक्षा आहे.

## स्त्रीजीवनाची द्वंद्वात्मक स्थिती

भारतीय स्त्रीजीवनाबद्दल बोलताना द्वंद्वात्मकतेचाच सामना आपल्याला करावा लागतो कारण प्राचीन काळापासून आजपर्यंतची सर्व काळातली स्त्री आजच्या भारतीय वर्तमान जीवनात उपस्थित आहे आणि तिच्याविषयी केलेल्या प्रत्येक विधानाच्या विरुद्ध विधानही आपल्याला वस्तुस्थिती म्हणून स्वीकारणं भाग आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या आपल्या भूमीवरच्या स्त्रियांकडे पाहताना एक समूह दिसतो जो चंगळवादी संस्कृतीच्या आणि बाजारपेठीय राजकारणाच्या सर्व अटींसह सर्व खेळी खेळण्यासाठी आणि लाभ अनुभवण्यासाठी उत्सुक आहे. दुसरा ह्या संस्कृतीचे दुष्परिणाम आर्थिक, बौद्धिक दुर्बलतेमुळे आणि सामाजिक व्यवस्थेतल्या उतरंडीवरच्या दुय्यम स्थानामुळे भोगतो आहे आणि तिसरा अत्यंत अल्पसंख्य गट नव्या जगात स्वत:चं स्थान जाणतेपणानं निर्माण करू बघतो आहे.

स्त्रीची पारंपरिक प्रतिमा मोडण्याचं ऐतिहासिक काम गेल्या पन्नास वर्षांत स्त्रियांनी कसं केलं याची साक्ष जशी सामाजिक क्षेत्रातलं तिचं कार्य देतं तसं वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारात स्त्रियांनी केलेलं लेखनही देतं आहे.

म्हणून सर्वांनीच हे लक्षात घेतलं पाहिजे की स्त्रियांच्या साहित्याबद्दल आणि स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल बोलताना, जे मुद्दे विरोधासाठी सोयीचे म्हणून आपण पुढे आणतो ते वस्तुत: सर्वच समाजाला, वेळीच आत्मपरिक्षण करण्यासाठी भाग पाडणारे मुद्दे आहेत आणि स्वातंत्र्याचा प्रश्न हा त्या पलीकडे जाऊन लक्षात घेण्याचा प्रश्न आहे. काळाच्या मोठ्या पटावरचा प्रश्न आहे.

## स्वातंत्र्याच्या अर्थाचा शोध

मुळात स्वातंत्र्याचा अर्थ काय हेही स्त्रिया आजवर शोधत आल्याच आहेत. असं नाही की ही आज घडलेली - आधुनिक संकल्पनेची गोष्ट आहे. खरं तर मुक्ती ही स्वातंत्र्यकल्पनेच्याही पलीकडे आहे आणि मुक्तीचा अर्थ तर अनादी काळापासून स्त्री-पुरुष शोधताहेत. स्त्रीच्या बाबतीत बंधनं-बाहेरची बंधनं आणि मर्यादा नाकारण्यातच तिची बरीचशी शक्ती खर्च झाली. तरी तिनं सगळे प्रयोग कधी धिटाईनं आणि कधी नाइलाजानं जाहीरपणे वर्षांनुवर्षं करून पाहिले आहेतच की. तिनं शोधलं आहे की तिच्या असण्याचा अर्थ काय? ती फक्त देवी आहे का?ती फक्त दासी आहे का? ती आई, मुलगी, बहीण, बायको, सासू, नणंद किंवा जाऊ, एवढीच आहे का? या भूमिका तिनं तपासून पाहिल्या आहेत आणि तिच्या लक्षात आलं आहे की हे तिच्या मूळ 'असण्याचे' अंश आहेतच. पण मूळची ती अशी आणि एवढीच नाही.

तिनं मग तिचं स्वत:च अस्तित्व तपासलं आहे. देह स्त्रीचा आहे

म्हणून ती स्त्री आहे का? तिनं देहाचं महत्त्व नाकारून पाहिलं आहे.

## भारतीय स्त्रीवाद

खरं तर याबाबतीत 'भारतीय स्त्रीवाद' स्वतंत्रपणे विचारात घ्यायला हवा आहे. इथे अगदी संस्कृतीच्या प्रारंभपर्वापासूनच स्त्रियांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे आविष्कार दिसतात आणि समाजव्यवस्थेतल्या तिच्या दुय्यम स्थानापासून वर उठवण्याचे आणि प्रतिमामुक्त होण्याचे साहसी प्रयत्नही दिसतात. भर सभेत विटंबना झाल्यानंतरही मोडून न पडता, ताठ मानेनं राजसभेच्या नव्हे, समाजपुरुषाच्याच न्यायबुद्धीला आवाहन करणारी अस्मितासंपन्न तेजस्विनी द्रौपदी, जोडीदाराविषयीच्या स्वत:च्या इच्छा अपेक्षांचाच मागोवा घेत लग्नाच्या बाबतीत स्वयंनिर्णयाचं स्वातंत्र्य घेणारी आणि पुढे त्या निर्णयाची जबाबदारी स्वत:च्या बुद्धिसामर्थ्यानं निभावणारी सावित्री, बापा-भावांच्या राजकारणाला बाजूला सारून आपल्या प्रेमिकाबरोबर सरळ निघून जाणारी रुक्मिणी आमच्या दिव्यकथांमधून अवतरलेली या स्त्रियांची अशी मिथकं विद्रोहाची स्वतंत्र्य परिभाषा बोलणारी आहेत.

किंबहुना देहस्विता नाकारण्याचे आणि स्त्रीचं अस्तित्व देहापुरतं आणि उपभोगापुरतंच मानण्याच्या आक्रमक पुरुषी अहंकाराला पराभूत करण्याचे प्रयत्न इथे काश्मीरच्या ललेश्वरीपासून महाराष्ट्रातल्या मुक्ताबाई आणि कर्नाटकाच्या अक्कमहादेवीपर्यंतच्या संतस्त्रियांनी ही यशस्वी केले आहेत आणि त्याहूनही मौलिक गोष्ट म्हणजे त्या प्रयत्नांमधेच केवळ न अडकता तसा विद्रोह हे अंतिम ध्येय नव्हे, तर केवळ निकराच्या क्षणी अटळपणे करावी लागलेली कृती आहे, हे जाणून त्या पुढे पुढेच गेल्या आहेत.

आमच्या संतस्त्रियांची रचना पहा. त्यांचे शब्द वाचता-ऐकताना लक्षात येतं की त्यांचा विठ्ठल तो नव्हेच बहुधा, जो तुम्हा-आम्हाला वाटतो. या तर स्वत:ला शोधत निघाल्या आहेत. अध्यात्माची रूढपरिभाषा या वापरताहेत, जशा आज कुणी मल्लिका, प्रज्ञा, नीरजा, प्रतिमा जोशी, प्रभाताई, आशाताई स्वत:ला मिळालेली भाषा वापरताहेत तशीच - त्या वेळी त्यांना उपलब्ध असलेली एक भाषा. पण त्यांचा शोध वेगळाच आहे. म्हणून मग सुरुवात झाली आहे ती 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे

उदास' इथपासून झाली आहे. तो उदासपणा वाटू न देणाऱ्या संतांची सोबत महत्त्वाची आहे, हे कृतज्ञतेनं सांगण्यापासून झाली आहे.

मग 'स्त्रियेचे शरीर, पराधीन देह, न चाले उपाव विरक्तीचा' असं बहिणाबाईंचं म्हणणं, 'देहावरी तुझी सत्ता असे जाण, माझेवरी तुझी अगदी नाही' असं विठाबाईचं म्हणणं ही एक बाहेरच्या नकारांपासून झालेली सुरुवात आहे; स्वतःच्या शोधाची सुरुवात आणि त्या बायका तेवढ्यावरच थांबलेल्या नाहीयेत. त्या पोचल्यायत 'अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग' इथपर्यंत. 'देव खाते, देव पिते, देवावरी मी निजते' असं म्हणता म्हणता, 'जनी म्हणे विठाबाई, भरुनी उरले अंतर्बाही' इथपर्यंत.

आणि हा जो एक प्रवास आहे बायकांनी केलेला तो एका काळापुरता नाहीच आहे. तो दर कालखंडात पुन्हा पुन्हा करावा लागणारा प्रवास आहे. पुन्हा या आत्ताच्या काळात, रजनी परुळेकर काचांचे तुकडे धगीवर वितळवत, जोडत, काचकमळं बनवणाऱ्या आणि ज्योतीकडे एकाग्रपणे पहात तिच्याभोवती जमलेल्या बायकांचं गाणं गातच आहेत. कमल देसाईंची 'हॅट घालणारी बाई' एका स्वप्नाच्या नादात, शोधात निघालेलीच आहे, आशाताई बग्यांची कथा-कादंबरी सगळ्या अस्थिरतेतल्या पडझडीनंतरच्या स्थिरतेचा ध्यास घेतेच आहे, एखादी मेघना इतरांनी शोधलेल्या वाटांवरून चालताना जेव्हा आपलं दुःख निवत नाही तेव्हा आपल्या सुखाची हरणवाट आपणच शोधायला हवी म्हणत लिहितेच आहे. एखादी अनुजा जोशी उन्हाचे घुमट खांद्यावर घेऊन चालतेच आहे.

## शुकतालिका न्यायाची चित्रे

ही म्हणजे शुकतालिका न्यायाची चित्रं आहेत. पोपट फांदीला उलटा लोंबकळतो आहे आणि त्याला कळत नाहीये की फांदी सोडली तरी तो पडणार नाहीये. तो उडू शकतो म्हणून. पण आजच्या लेखिकांकडे - कथाकार, कादंबरीकार, ललित गद्यकार, कवियित्री - सगळ्याजणींच्या लेखनाकडे पहा. सगळ्या गंभीर, प्रामाणिक, आत्मप्रत्ययाचं लेखन करणाऱ्या या सगळ्याजणींचे 'शुक-शकून' तुम्हाला त्या लेखनात दिसतील. फांदी सोडून आपण पडत नाही तर उडतो, हे लक्षात येण्याचे शकूनक्षण त्या प्रत्येकीच्या लेखनात विखुरलेले आहेत आणि त्या क्षणामागची सगळी आकांताची धडपडही त्यांच्या लेखनात आपल्याला दिसते. ती फांदी

कशाची आहे ? परंपरेची ? पुरुषसत्तेची ? शोषक व्यवस्थेची ? की स्वत:च्या अज्ञानाची ?– इथपासून आधी समजून घेणं आहे आणि मग फांदी सोडणं आहे. उडण्याची प्रत्येकीची शक्ती निराळी असली तरी त्यासाठी मोजलेली किंमत आणि अनुभवलेला उडण्याचा अर्थ यांचं महत्त्व सगळ्या लिहित्या बायकांसाठी खूपच मोठं आहे.

मी आपलं लक्ष लोकपरंपरेकडेही वेधते आहे. स्त्रियांनी निर्माण केलेलं मौखिक वाङ्मय म्हणजे मध्यमयुगीन स्त्रीजीवन, तिची सुखदु:खं आणि त्याचबरोबर तिचं शोषण, दमन आणि अन्याय यांचा जसा दस्तऐवज आहे, तसाच तो लोकपरंपरेतली स्त्रियांची प्रतिभाशक्ती, जगण्यातून तिला आलेलं अनुभवजन्य शहाणपण, आणि तिची परंपरेच्या पुनर्वाचनाची स्वतंत्र रीती यांचाही दस्तऐवज आहे.

**राम म्हणू राम, न्हाई सीतंच्या तोलाचा**
**हिरकणी सीतामाई, राम हालक्या दिलाचा**

ही रामायणाची मौखिक परंपरेतली स्त्रीवादी समीक्षाच आहे असं म्हणता येईल.

या सगळ्याच भूतकाळातल्या, मिथकांतल्या, मौखिक परंपरेतल्या आणि आज लिहीत असलेल्या इथल्या आणि जगभरातल्या या बायकांनी पुष्कळच काही करून ठेवलं आहे. माणसांमाणसांतली ओल कमी होण्याचे कोरडे ऋतू दीर्घ होत असताना, मनातल्या भूमिगत प्रवाहांचा त्यांनी चालवलेला शोध, जात, वर्ग, धर्म यांचा त्यांनी केलेला सूक्ष्म विचार, त्यांनी शोधलेले जुन्या–नव्याचे ताण, भावात्मता आणि बौद्धिकता यांची सांगड घालत त्यांनी उघड केलेल्या लेखनाच्या वेगवेगळ्या शक्यता, त्यांनी रूढ संकेत नाकारून उभी केलेली स्वतंत्र, कणखर नैतिकता, लोककथांचे, पुराणकथांचे त्यांनी लावलेले नवे अन्वय, आपल्या कारावासाचं स्वरूप समजून आल्यावर त्यांनी सुटकेचा केलेला अथक शोध, त्यांनी दूर केलेली स्वत:वरची आवरणं आणि रोमँटिसिझमची पुनर्रचना करण्याचं त्यांचं साहस, पुरुषसापेक्षातच फक्त नव्हे तर एकूणच परावलंबन नाकारून, एकटेपणाच्या जाणिवेचा त्यांनी केलेला निखळ करारी स्वीकार आणि निर्मितीशक्तीचा शोध घेता घेता कलानुभवातून, सौंदर्यानुभवातून त्यांनी केलेला जीवनाविषयीच्या आस्थेचा सूक्ष्मसुंदर विस्तार –

मग त्या लोकप्रतिभेचं महानपण घेऊन आलेल्या बहिणाबाई चौधरी

असोत, आत्मचरित्राचा मानदंड निर्माण करणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक असोत, स्त्रीजीवनाविषयी मर्मदृष्टी असणाऱ्या मालतीबाई बेडेकर आणि गीता साने असोत, समीक्षक आणि कथालेखक कुसुमावती देशपांडे असोत, विचक्षण सरोजिनी वैद्य असोत किंवा ज्ञानक्षेत्रातल्या कर्तृत्वाच्या संदर्भात आपली स्त्री-पुरुष जाणीव मिटवणाऱ्या दुर्गाबाई-इरावतीबाईंसारख्या प्रज्ञावती असोत किंवा गौरी देशपांडे, इंदिरा संत, सुनीताबाई, शांताबाई, विजयाबाई, प्रभाताई, उषा किरण आत्राम ते सानिया, कविता महाजन, प्रज्ञा पवार, नीरजा, प्रतिमा जोशी, मोनिका गजेंद्रगडकर, अनुजा जोशी, कल्पना दुधाळ, सुचिता खुल्लाळ... कितीतरी... मला तर आज १९०६ मध्ये 'सुलतानाज् ड्रीम' लिहिणाऱ्या आणि

**'आम्ही फक्त हिंदू, फक्त मुसलमान, फक्त पारसी किंवा फक्त ख्रिश्चन नाही आहोत'**

किंवा

**'आम्ही फक्त बंगाली, फक्त तमिळ, फक्त मारवाडी किंवा फक्त पंजाबी नाही आहोत.'**

किंबहुना

**'आम्ही आधी भारतीय आहोत**
**आणि मग इतर कोणी आहोत'**

असं लिहिणाऱ्या बंगालमधल्या रुक्कैय्या हुसेनपासून आजपर्यंतच्या अनेक सक्षम लेखिका दिसत राहतायत.

## समकालीन साहित्यचित्र

आजचं मराठी साहित्याचं चित्र असं आहे की समकालीन वास्तवाचा वेध चहू अंगांनी घेणारे तरुण कवी-कथाकार आपल्याला दिसताहेत. महानागरीय जीवनापासून अर्धग्रामीण, ग्रामीण जीवन, त्यातल्या भयाच्या, असुरक्षिततेच्या, जीवघेण्या स्पर्धेच्या, हताशेच्या, हातून निसटलेल्या आयुष्याच्या सगळ्यासकट, या वर्तमान साहित्यकारांच्या निर्मितीचा विषय झालं आहे.

भाषेला हे लेखक सक्षमपणे वाकवताहेत, खेळवताहेत, वापरताहेत. यांची अभिव्यक्तीचे घाटही नवे आहेत. सर्वसामान्य माणसांना या तंत्रप्रधान जगात भावात्मक कुपोषणाची जी जाणीव होते आहे ती अधिक संवेदनशील

असणाऱ्या या साहित्यिक कलावंतांना अधिक तीव्रपणे होते आहे. पण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे घोडे अकल्पनीय वेगानं दौडत चालले आहेत आणि त्या वेगाच्या सपाट्यात कलांच्या हातून विस्मयाची, कल्पकतेची, स्वप्नांची शिदोरी मात्र निसटून जाते आहे. आनंद कुमारस्वामी किंवा अमृता शेरगिलपाशी घोडे क्षणभर थांबवता येत नाहियेत.

खरं तर मराठीला ज्ञानोबा-तुकोबांपाशी, जना-बहिणापाशी किंवा बालकवी-मर्ढेकरांपाशी थोडं थांबून ते निसटलं पाथेय उचलता येईल. बी. व्ही. कारंथ, ए. के. रामानुजन, कोमल कोठारी, बन्सी कौल, कन्हैयालाल मुन्शी, सीताकांत महापात्रांना विचारून सांस्कृतिक परंपरांची देशभर पसरलेली आंतरवीण पाहता येईल. भाषावार प्रांतरचनेला ओलांडून जाणाऱ्या सांस्कृतिक भूगोलाची ओळख तिला होईल. दुराव्याला आणि प्रक्षोभाला जन्म देणारी मिथकं बाजूला सारून परिवर्तनाच्या रोख एकरसतेकडे वळवणारी समन्वयशीलता स्वीकारता येईल. आयुष्यांना आलेली रखरख मानवी संबंधांच्या ओलाव्यानं कमी करता येईल.

वैदिक परंपरेइतकंच वेदबाह्य परंपरांचं अस्तित्व महत्त्वाचं आहे, समाजाच्या मेरेवर उभ्या राहिलेल्या समूहांच्या हाका महत्त्वाच्या आहेत, प्रमाण भाषेप्रमाणे प्रादेशिक भाषांचं जिवंतपण महत्त्वाचं आहे याचं भान उभयपक्षी अस्मिता काटेरी न करता ठेवलं तर केवळ वाङ्मयीन संस्कृतीच्याच नव्हे तर एकूणच मानवी संस्कृतीच्या मर्माची जाण आपल्याला अधिक चांगली होईल. ज्ञानेश्वर-तुकारामांनंतर आपल्याला विश्वात्मक भावाशी घेऊन जाणारे मर्ढेकर आपल्या सोबत चालत आहेत, चालणारही आहेत याची कृतज्ञता म्हणून त्यांचं स्मारक उभारण्याची अनेकांची धडपड अयशस्वीच राहिली आहे. पण,

**आण तुझ्या लालसेची, आण लोकांची अभागी**
**आण माझ्या डोळियांची, पापणी ठेवीन जागी**

असं म्हणणाऱ्या मर्ढेकरांनी आपल्या वाङ्मयविचारांतला करुणेचा धागा थेट महाभारतापासून ओढून आणला आहे ही फार मौलिक गोष्ट आहे. शिवाय व्यासांनी व्यक्त केलेली करुणाही दुबळी नाही; उलटअतिशय प्रगल्भ आणि कणखर करुणा आहे, जी जीवनाच्या सर्वभावे स्वीकारातून आपोआप उमलून येते. हा सहिष्णुतेचा आणि मानवीय करुणेचा धागा 'जीभ दातांनी चावली, कोणे बत्तिशी तोडली?' असं विचारणाऱ्या

मुक्ताबाईंपर्यंत येतो आणि तोच बुद्ध–महावीरांपासून थेट

**लोभ जिव्हेचा जळू दे, दे थिजू विद्वेष सारा**
**द्रौपदीचे सत्त्व माझ्या लाभु दे भाषाशरीरा**
**जाऊ दे कार्पण्य 'मी'चे, दे धरू सर्वांस पोटी**
**भावनेला येउ दे गा शास्त्रकाट्याची कसोटी**

असं म्हणणाऱ्या मर्ढेकरांपर्यंत येताना दिसतो. ही करुणा आपल्याला विद्रोहाशी थांबू देणारी नाही. परिवर्तन हीच जीवनाची मुख्य खूण आहे आणि तिचीच प्रतिबिंबं वाङ्मयात–कलेत दिसत आली आहेत – दिसणार आहेत. हे जर सत्य असेल तर ते परिवर्तन व्यापक विश्वभानातून मनुष्यहितैषी करण्यासाठी तीच खूण आपल्याला समूहजीवनात सहिष्णुतेकडे वळवत राहील.

**मिसिसिपीमध्ये मिसळू दे गंगा, ऱ्हाइनमध्ये नंगा करो स्नान**

किंवा,

**रक्तारक्तातील कोसळोत भिंती, मानवाचे अंती एक गोत्र**

असं म्हणणारे विंदा सरदार जाफरींच्या शेजारी उभे राहून येणाऱ्या 'नव्या जगाला प्रणाम' करताना दिसतील. सरदार जाफरींचेच शब्द मी व्याख्यानाच्या अखेरीला आपल्या हाती देते –

कलावंत, साहित्यिक, नव्हे सगळेच जीवनाचा आदर करणारे लोक जाफरींच्या शब्दांत म्हणताहेत –

**आम्ही नेहमीच क्षणांसारखे येत राहिलो आहोत**
**आणि पुढेही येत राहू**
**काळाच्या अस्वस्थ, विस्तीर्ण उदरात बुडून जणाऱ्या क्षणांसारखे !**
**तसे पाहिले तर सारे क्षण सारखेच असतात**
**तरीपण ते समान नसतात, एकच नसतात**
**प्रत्येक क्षण ही एक नवी अभिलाषा असते, शोध घेण्याची एक नवी धडपड**
**एक नवे वाद्य, एक नवे गीत, एक नवी ज्योत, एक नवा प्रकाश!**
...
**आम्ही काळरूपी सागरातून लाटांप्रमाणे उसळत येतो आणि असेच उसळत येत राहू.**

जीवनरूपी नौकेला आम्ही आपल्या तरल हृदयावर घेऊन पुढे पुढे जात राहिलो आहोत

आणि असेच पुढे जात राहू.

या नौकेचे नावाडी अनादि काळापासून बदलत राहिले आहेत आणि पुढेही बदलत राहतील.

शिडांच्या रूपाने माणसे फडफडत राहिली आहेत आणि पुढेही फडफडत राहतील.

मानवतेची ही सुरेख नौका अशीच चालत राहिली आहे आणि पुढेही चालत राहील.

...

उद्या आम्ही असणार नाही पण जीवन आनंदाने हसत राहील, आपले दिवे तेवत ठेवील.

आकाशाचा निळा रंग तेवढाच मनोहर राहील आणि क्षितिजाचे भाळ तसेच प्रकाशाने चमकत राहील.

♦♦♦